**मे. नीलकंठ इन्फ्रा मायनिंग लिमिटेड, टाईम्स स्क्वेअर ग्रँड, सिंधू भवन रोड, थलतेज, अहमदाबाद-३८००५९, गुजरात यांनी त्यांच्या प्रस्तावित मार्की-झरी-जामणी-अडकोली कोळसा खाण, मौजा अडकोली, पौनर आणि गणेशपूर खुर्द, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ येथील प्रस्तावित उत्पादन क्षमता १.२५ दशलक्ष टन / वर्ष कोळसा करीता खाण पट्टा क्षेत्र ३५३.५० हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबतच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २३/०७/२०२६ |
| वेळ | : | दुपारी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ - मे. नीलकंठ इन्फ्रा मायनिंग लिमिटेडच्या अडकोली-झरी-जामणी माईन/प्रकल्प क्षेत्रात गट नं. ४७/२ थेरे यांचे शेतात, अडकोली-पांढरकवडा मेन रोड, गाव अडकोली, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ. |

**प्रस्तावना:-**

मे. नीलकंठ इन्फ्रा मायनिंग लिमिटेड, टाईम्स स्क्वेअर ग्रँड, सिंधू भवन रोड, थलतेज, अहमदाबाद-३८००५९, गुजरात यांनी त्यांच्या प्रस्तावित मार्की-झरी-जामणी-अडकोली कोळसा खाण, मौजा अडकोली, पौनर आणि गणेशपूर खुर्द, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ येथील प्रस्तावित उत्पादन क्षमता १.२५ दशलक्ष टन / वर्ष कोळसा करीता खाण पट्टा क्षेत्र ३५३.५० हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक १९ डिसेंबर, २०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. नीलकंठ इन्फ्रा मायनिंग लिमिटेड, टाईम्स स्क्वेअर ग्रँड, सिंधू भवन रोड, थलतेज, अहमदाबाद, गुजरात यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २८/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी यवतमाळ, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २३ जुलै २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ

चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन व दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २०/०६/२०२६ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६. जिल्हा परिषद, यवतमाळ.
७. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८. उप-विभागीय कार्यालय झरी जामणी, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ.
९. नगर परिषद झरी जामणी, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ.
१०. तहसिल कार्यालय झरी जामणी, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ.
११. पंचायत समिती कार्यालय झरी जामणी, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ.
१२. उप-विभागीय कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१३. नगर परिषद वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१४. तहसिल कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१५. पंचायत समिती कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१६. ग्राम पंचायत कार्यालय अडकोली, कोसारा , मार्की बु, पांढरकवडा, चिंचघाट, दाभाडी, मागुर्ला बू, बोपापूर, दरा, नगर पंचायत झरी, अर्धवन, भेडाळा, दाभाडी, सिधी वादोणा, निमनी, लिंगटी, येदलापूर, झमकोला, खडकी, खरबडा, मुकुटबन, पिंपरड, हिरापूर, मागली, मांडवा, पांढरवणी, शिबला ता. झरी जामणी, जि. यवतमाळ.
१७. ग्राम पंचायत कार्यालय वाढोना पिलकी, बाबापूर, गोपाळपूर, दहेगाव, इंजासन, नेरड, सोनेगाव, कायर, घोन्सा, कुंभारखानी, साखरा, बोदड बु., गणेशपूर, गाडेघाट, परसोडा, ता. वणी, जि. यवतमाळ.
१८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते १७ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश दिनांक ११/०७/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १० सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्त:-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. विकास मीना, भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. बंडु ऊर्फ महादेव दामु पारखी, मु. पो. मार्की (बु), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सृष्टीतील जीवजंतु जगण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखला गेला पाहिजे. पर्यावरणाचा ऱ्हास झाला तर मनुष्यमात्राला जगणे कठीण होईल. मानव जमात पर्यावरणाचा अविभाज्य अंग आहे. पर्यावरणात बदल झाल्यास त्याचा मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होतो. मे. निळकंठ इन्फ्रा मायनिंग कोळसा खाण प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील समाविष्ट असणाऱ्या जनतेची उपजिविका शेतीवर आधारीत असून या परिसरातील मुख्य व्यवसाय शेती आहे. म्हणून शेती जगणारा प्रत्येक माणूस तो मालक असो वा मजूर त्याला आपल्या देशातील इतर नागरीकाप्रमाणे सन्मानाने जगता आले पाहिजे त्यासाठी त्याचा धंदा फायदाचा झाला पाहिजे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या पिकांची नूकसान होणार नाही याची हमी कोण घेणार आहे. या कोळसा खाण प्रकल्पामुळे या परिसरातील बाधित क्षेत्रात पर्यावरणात बदल होणार असून शेती व्यवसायावर अनिष्ट परिणाम होणार आहे. या झरीजामणी तालुक्यामध्ये एमपी बिर्ला सिमेंट प्रकल्प आणि दोन कोळसा खदानी सुरू असून त्य प्रकल्प धारकाने ठोस उपाययोजना केल्या नसल्यामुळे, प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसान झाले आहे.<br>**१) पाण्याची पातळी:-**<br>या कोळसा खाण प्रकल्पामुळे जमीनीतील पाण्याचा फार मोठ्या प्रमाणात उपसा होणार असून पण्याची पातळी कमी होईल. या प्रकल्पाच्या परिसरात बोरवेल द्वारे शेतीला सिंचन केले जाते. मग जमिनीत पाण्याची पातळी कमी झाल्यास शेतकऱ्यांचे बोरवेल बंद पडेल आणि ओलीताची शेती करणारी शेतकरी कोरडवाहु शेतकरी होईल. यावर उपाय योजना करण्यात यावी.<br>**२) पिकाची नूकसान भरपाई:-**<br>या कोळसा खाण प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे बाधित परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसान होणार | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीचे तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वक्त्यांनी प्रकल्पासंदर्भात अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. जनसुनावणीच्या कार्यवाहीदरम्यान यापुढे उपस्थित होणारे सर्व मुद्दे पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तसेच कंपनीमार्फत विधिवत नोंदविण्यात येतील व त्याबाबत कंपनीकडून उत्तर सादर करण्यात येईल. उपस्थित करण्यात आलेल्या अनेक मुद्द्यांचा समावेश यापूर्वीच्या सादरीकरणामध्ये करण्यात आलेला आहे. तथापि, एखादा मुद्दा सादरीकरणामध्ये समाविष्ट होणे राहिले असल्यास, त्या संदर्भात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती कंपनीकडून अंतिम अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येईल. |

आहे. शेतकऱ्यांच्या पिकांची नूकसान भरपाई प्रति हेक्टरी आजच जाहीर करावी.

३) **समान न्याय:-**

अडकोली, पवनार आणि गणेशपूर (खु) या तीनही गावाच्या संपूर्ण शेतकऱ्यांच्या शेतजमीनी संपादन करण्यात येऊन त्या शेतकऱ्यांच्या संपूर्ण जमीनी या प्रकल्पात समाविष्ट करण्यात याव्या. त्यामुळे तीनही गावाच्या शेतकऱ्यांना समान न्याय मिळेल. अशा प्रकारे ठराविक शेतकऱ्यांच्या जमीनी प्रकल्पात गेल्यावर इतर शेतकऱ्यांना कोळसा खाणीच्या प्रदूषणामुळे शेती करणे कठीण होईल त्या शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे.

४) **शासकीय नियमानूसार कायमस्वरूपी रोजगार:-**

या कोळसा खाण प्रकल्पात २७१.६० हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे आणि फक्त ५५७ लोकांना रोजगार देण्यात येणार आहे. वेस्टर्न कोलफिल्ड प्रमाणे कायमस्वरूपी रोजगार आणि तशा प्रकारचे वेतन (पगार) यांनासुद्धा देण्यात यावा.

५) **शेअर्स:-**

ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी या प्रकल्पामध्ये घेतल्या जाणार आहे त्या शेतकऱ्यांना कंपनीच्या नफ्यातून शेअर्स देण्यात यावा.

६) **विकास कामे:-**

मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे आदेशानूसार प्रकल्पाच्या बाधित गावात विकास कामे करण्यात यावी. झरीजामणी तालुक्यात सुरू असलेल्या प्रकल्पधारकाकडून बाधित परिसरात विकास कामे केली जात नाही.

७) **जलसाठा व्यवस्थापन:-**

कोळसा खाणीमधुन जमीनीतील पाण्याचा जो उपसा केला जातो त्यासाठी तलावाची निर्मिती करण्यात यावी. तलावात साठवणूक केलेले पाणी शुद्ध करून बाधित परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत देण्यात यावे.

८) **वृक्ष लागवड:-**

प्रस्तावित प्रकल्पाच्या अहवालामध्ये हेक्टरी २५०० वृक्ष लागवड करण्याचे नमूद केले आहे. मग झरीजामणी तालुक्यामध्ये सुरू असलेल्या प्रकल्पांमध्ये किती वृक्ष लागवड केली आहे याचा

लेखा जोखा देण्यात यावा. अशा प्रकारे प्रकल्पधारकाने फसवणूक केल्यास निसर्गाचा ऱ्हास होईल. ज्या मोहफुल वृक्षाणने ४५ वर्षासाठी आम्हाला जिवंत ठेवण्याचे काम केले ते वृक्षसुध्दा आता नष्ट होत आहेत.

**९) खनन व पुनर्भरण:-**

कोळसा खाणीमध्ये खाणकाम सुरू केल्याच्या सातव्या वर्षानंतर खनन व पुनर्भरण एकाच वेळी करण्याचा नियम आहे. हा नियम पाळला जात नाही. आमची फसवणूक केली जाते. तिथे वृक्ष लागवडसुद्धा केली जात नाही.

**१०) जंगली जनावरे नियोजन:-**

या प्रकल्पाच्या बाधित परिसरामध्ये वाघ, हरीण, रानडुक्कर असे अनेक जनावरे आहेत. जंगली जनावरांची नोंद घेण्यात आली नाही. रानडुक्कराच्या त्रासामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसान केले जात आहे. या कोळसा खाणीमुळे रानडुकरे शेतात येऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसार करणार आहे. यावर काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय?

**११) आरोग्याची हमी:-**

या कोळसा खाणीमुळे बाधित परिसरातील जनतेचे आरोग्य धोक्यात येणार आहे. जनतेच्या आरोग्याची कोळजी घेण्यासाठी प्रकल्पधारकाने स्वत:चा दवाखाना आणि तज्ञ डॉक्टरांची व्यवस्था करून मोफत आरोग्याची सुविधा पूरविण्यात यावी.

**१२) वाहतूक व्यवस्था:-**

कोळसा वाहतूक करण्यासाठी प्रकल्पधारकाने स्वत:चा वेगळा रस्ता तयार करावा. त्यामुळे अपघात होणार नाही. कोळसा वाहतूक करताना प्रदूषणा होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

**१३) पायाभूत सुविधा:-**

कोळसा खाण बाधित परिसरातील जनतेला शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, कृषी व पशुसंवर्धन या सारख्या पायाभूत सुविधा पूरविण्यात याव्या. आमच्या परिसरात कोळसा खनन होत असल्यामुळे बाधित परिसरातील शेतकऱ्यांना कृषी पंपाचा विद्युत पुरवठा दिवसा करण्यात यावा. नाहीतर कोळसा आमचा आणि वीज मुंबईला असे करू नये.

**१४)जमीन खरेदी-समान मोबदला:-**

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांच्या जमीनी खरेदी करताना सर्व शेतकऱ्यांना समान मोबदला देण्यात यावा. तो जमीनीचा मोबदला प्रसारमाध्यमांद्वारे जाहीररीत्या प्रसारित करण्यात यावा त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही.<br>**१५) कृषी मार्गदर्शन:-**<br>बाधित परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे कोळसा खाणीमुळे होणारे नूकसान टाळण्यासाठी कृषी मेळाव्याच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात यावे.<br>**१६) पुरातन मंदिराच्या वास्तुचे जतन:-**<br>कोळसा खाणीच्या प्रकल्पाकरिता रीतसर पुरातन विभागाकडून माहिती घेण्यात आली नाही. कोळस खाण प्रकल्पाच्या बाधित परिसरात अनेक पुरातन मंदिरे आहेत. प्रकल्पाच्या १० कि.मी. अंतरावर कायर या गावालगत भुडकेश्वर नावाचे विदर्भात गरम पाण्याच्या झऱ्याचे मंदिर आहे. या पुरातन वास्तुची जतन करण्यात यावी आणि या भुडकेश्वर देवस्थानाचा जीर्णोद्धार करण्यात यावा.<br>वरील नमूद केलेले आक्षेप प्रकलप धारकांना मान्य नसेल तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | |

**२) श्री. चंद्रकाम घुग्घूल, शेतकरी तथा शिवसेना (शिंदे गट) विधानसभा प्रमुख, गणेशपूर (बु), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | यापूर्वी देखील मांगली गावामध्ये जनसुनावणी घेण्यात आली होती. माझा औद्योगिकीकरणाला विरोध नाही. परंतु आपल्या या झरीजामणी तालुक्यामध्ये दोन कोळसा खाणी असून त्यापैकी एक खाण सुरू व एक खाण बंद अवस्थेत आहे. या क्षेत्रात चुना भट्ट्या, डोलोमाईटचे ८-१० प्रकल्प व एक मोठा सिमेंट उद्योग, कार्यरत आहे. परंतु या कंपन्यांच्या बाधित क्षेत्रातील दुरावस्था पाहता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी फक्त जनसुनावण्या घेण्याकरिताचा या क्षेत्रात येत असल्याचा माझा आरोप आहे. त्याचा सर्वात जास्त फटका स्थानिक शेतकऱ्यांना व सर्वसामान्य जनतेला बसत आहे. तसेच या विरोधात स्थानिकांना उपोषणाला बसावे लागते. प्रकल्पाच्या जवळच्या क्षेत्रातील प्रदूषणामुळे या क्षेत्रातील शेतमालाची | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जमीन अधिग्रहणादरम्यान दलालाचा समावेशाबाबत कंपनीला पूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत की, दलालाचा समावेश असल्यास कंपनीवर कारवाई करण्यात येईल. तसेच कंपनीतर्फे स्पष्टीकरण देण्यात आले आहेत की, जमीन अधिग्रहाणाच्या प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारे दलालाचा हस्तक्षेप नसणार आहे. जर असा प्रकार लक्षात आल्यास उपविभागीय अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केल्यास त्याची दखल घेण्यात येईल. स्थानिकांना यवतमाळ येथे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत येण्याची |

| | | |
|---|---|---|
| | गुणवत्ता खालावते व शेतकऱ्यांना योग्य तो भाव मिळत नाही. त्यामुळे कापसाची गुणवत्ता नसल्याने कापूस परत केला जातो व CCI च्या धोरणानूसार कापसाला योग्य तो भाव मिळत नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर विषय लक्षात घेऊन येथील प्रकल्पांना भेटी देऊन व प्रकल्पालगतच्या शेतकऱ्यांसोबत विचार विनिमय आणि चौकशा करून प्रकल्पधारकांतर्फे शेतकऱ्यांना आजच्या बाजारभावानूसार मोबदला देण्यास सांगितले पाहिजे. कंपनीमध्ये एखाद्या शेतकऱ्याची पूर्ण जमीन जात नसल्यास त्याला पूर्ण शेतीचे मुल्यांकन करून बाजारभावानूसार मोबदला देण्यात यावा. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रदूषण व आरोग्याच्या समस्या उद्भवणार आहेत. आरोग्याच्या समस्यांकरिता कंपनीने दवाखाना सुरू करावा. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसोबतच शेतमजूरांना देखील कंपनीच्या पे-रोलवर नोकरी देण्यात यावी. कंत्राटी पद्धतीवर रोजगार देण्यात येऊ नये कारण कंत्राटदार मनमानी कारभार करतात. रोजगारामध्ये अडकोली, पवनार व गणेशपूर (खु) या गावातील युवकांना प्राधान्य देण्यात यावे, त्यानंतर बाहेरील युवकांना प्राधान्य देण्यात यावे. या क्षेत्रामध्ये वनजमीनी आहेत. या जमीनींचे अधिग्रहण करताना शासनाने कोणतेही अतिरिक्त शुल्क घेऊ नये. भेगवटदार-१ च्या जमीनीकरिता जो दर कंपनीतर्फे देण्यात येईल त्याच दरात कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांना द्यावा. या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोठ्या प्रकल्पांनी जसे की, आरसीसीपीएल व इतर प्रकल्पांनी DAV स्कूल सारख्या शाळा उभारल्या नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, या क्षेत्रामध्ये DAV स्कूल सारख्या शाळा उभारण्यात याव्या. जमीन अधिग्रहीत करताना कंपनीने कुठल्याही दलालामार्फत जमीनी न घेता थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधून विचार विनीमय करून जमीनी अधिग्रहीत कराव्या. अडकोली ते घोन्सा दरम्यान रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था आहे. सदर रस्ता दुरूस्त करण्यात यावा व रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात यावे. तसेच सिमेंटीकरण व कॉंक्रिटीकरण करण्यात यावे. तसेच बोरी ते वणी या रस्त्याचे देखील चौपदरीकरण करण्यात यावे. | आवश्यकता नाही. पिकांच्या नूकसान भरपाई संदर्भात मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून मागील महिन्यात १९ तारखेला या क्षेत्राचा दौरा करण्यात आला आहे. सदर समितीमध्ये जिलहाधिकारी देखील सदस्य आहेत. त्यामध्ये शासनाला मोबदल्याच्या उपाययोजनांबाबत सूचना देण्यात येत आहेत. तसेच एका ऋतुमध्ये किती अनुदानाची आवश्यकता आहे त्याबाबत देखील धोरण ठरविण्यात येत आहे. सदर समितीने वणी परिसरातील खाण बाधित क्षेत्राची पाहणी केली होती. त्याबाबतचा अहवाल जिलहाधिकारी कार्यालयातर्फे सादर करण्यात आला आहे व पुढील दोन-तीन महिन्यांमध्ये तोडगा निघणे अपेक्षित आहे. त्याकरिता कंपनीदेखील बांधील असणार आहे. कंपनीने वृक्षारोपणाकरिता जे आश्वासन दिले आहे त्याबाबत कंपनीने परत एकदा अवलोकन करावे व त्यानूसार स्थानिक पातळीवर त्याची अंमलबजावणी करावी. वृक्षारोपणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे अचानकपणे पडताळणी करण्यात येईल. वृक्षारोपणामुळे पिकांचे नूकसान व प्रदूषण कमी प्रमाणात होईल. त्यामुळे स्थानिकांच्या जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही. स्थानिकांच्या मागणीनूसार सीएसआर निधीचा वापर करण्यात यावा. स्थानिकांच्या मागणीनूसार मंदीर, दवाखाना व शाळा यापैकी कोणत्याही एक सुविधेची निवड करून त्याबाबत योग्य ती कार्यवाही कंपनीने करावी. |

३) **श्री. नेताजी पारखी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा परिसर प्रामुख्याने पेसा क्षेत्रामध्ये येतो. त्यामुळे प्रामुख्याने जमीन देणे किंवा न देणे हा स्थानिक ग्रामपंचायतीचा हक्क असतो. त्यांनी या कंपनीसोबत दराबाबत जे काही करार झाले असतील किंवा त्यांच्या मागणीप्रमाणे जमीनीचा दर देण्यात यावा. पेसा अंतर्गत माझे गाव माझे राज्य या नूसार ग्रामपंचायतीच्या ना-हरकतीशिवाय सदर जनसुनावणी घेण्यात आली नाही. ग्रामसभेमध्ये ठरल्याप्रमाणे स्थानिकांना त्यांच्या जमीनीचा मोबदला देण्यात यावा. मे. निळकंठ इन्फ्रा मायनिंग लि., अडकोली-मार्की कोळसा खाण केवळ १२ वर्षांसाठी रोजगार देणार आहे. अठरा वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंपन्या बंद पडलेल्या असून सदर कंपनी १२ वर्षे कार्यरत राहणार याबाबत शंका आहे. त्यामुळे आमचा शेतीचा व्यवसाय हिसकावून कायमस्वरूपी रोजगार मिळणार नाही. आम्हाला कायमस्वरूपी रोजगार मिळणार नसेल. शेती आमचा पिढ्यानपिढ्या जगण्याचा आधार आहे. शासनाने जमीन अधिग्रहीत केल्यास त्या मोबदल्यात शासकीय नियमानूसार वेतन दिला जातो. परंतु या ठिकाणी आम्हाला फक्त रू. ३४०/- प्रमाणे रोजंदारीच्या तत्त्वावर कंपनीतर्फे नोकरी देण्यात येते. शेतकऱ्यांतर्फे फवारणी करणाऱ्या मजूराला रू. ७००/- प्रमाणे वेतन देतो. १२ वर्षांनंतर स्थानिक नागरीक कसे जगतील हा प्रश्न उपस्थित होतो. या प्रकल्पामुळे आमचा सांस्कृतिक, सामाजिक, परंपरा व प्रथा यामध्ये दुर्व्यवहार होणार आहे. तसेच या क्षेत्रात जवळपास ८० हेक्टर जंगलामध्ये व्याघ्र प्रकल्प प्रस्तावित आहे. व्याघ्र प्रकल्पाचा देखील कंपनीने विचार केलेला नाही. जनसुनावणीमध्ये दोन प्रतिवाद्यांमध्ये संभाषण होते व त्यानूसार न्याय दिला जातो. परंतु समितीने स्पष्ट केले आहे की स्थानिकांचे मत नोंदविण्यात येत असून ते शासनाकडे सादर करण्यात येईल. परंतु शासनस्तरावर झालेल्या निर्णयाचा उहापोह आमच्यापर्यंत पोहोचत नाही. सेडीमेंटेशन टँक आजपर्यंत या क्षेत्रातील कोणत्या खाणींमध्ये बसविण्यात आले आहे याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगावे. सेंडीमेंटेशन टँक मध्ये प्रक्रिया केल्यानंतर पाणी | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जिल्हा खनिज निधीचे नियोजन मागील एक वर्षापासून सुरू आहे. खनिज निधीचा वापर उत्खनन क्षेत्राच्या २५ कि.मी. परिघामध्येच करावयाचा आहे. सदर निधी पुसद, बाभूळगांव किंवा नेरमध्ये खर्च करता येत नाही. परिसरातील सर्व शाळा, आंगणवाडी व दवाखान्याचे बांधकाम व्हायला पाहिजे. या ठिकाणी मागणी करण्यात आली होती की एक मोठी शाळा या परिसरामध्ये उपलब्ध व्हायला पाहिजे. त्यानूसार आदिवासी आश्रमशाळेची पाहणी करण्यात आली आहे. पुढील काही दिवसांमध्ये या क्षेत्रात एक मोठी शाळा उपलब्ध होईल. ही जनसुनावणी संपल्यानंतर मी त्या ठिकाणी पाहणीकरिता जाणार आहे. तसेच दर्जेदार शाळा उभारण्याकरिता जिल्हा खनिज निधीमधून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येईल. जिल्हा खनिज निधीमध्ये प्रत्येक वर्षी जवळपास १०० कोटींचा निधी येतो. त्यामधून दरवर्षी प्रकल्पग्रस्त गावांमध्ये विकासकामे करण्यात येणार आहेत. पुढील काही वर्षांमध्ये त्याची अंमलबजावणी स्थानिकांना झालेली दिसेल. प्रदूषणाबाबत योग्य ती मॉनिटरींग करण्यात येणार आहे. स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी जनसुनावणीबाबत काही सूचना व आक्षेप असतील तर ते उपस्थित करावे. तसेच आपले म्हणणे थोडक्यात मांडावे व मुद्यांचा पुनरूच्चार करण्यात येऊ नये. |

| | | |
|---|---|---|
| | जलस्त्रोतांमध्ये सोडण्यात येते परंतु तसे होत नाही. डोंगराच्या परिसरामधून पाणी वाहून सखल भागांमध्ये साचत असते. अडकोली, पवनार हा भाग डोंगर क्षेत्रातील पाणलोट क्षेत्रात येत असल्याने या क्षेत्रात उत्खनन केल्यामुळे पाण्याची पातळी खालावेल व कालांतराने जमीनीतील पाण्याचा साठा नष्ट होणार आहे. या पाण्यावर अवलंबून असणारी आमच्या शेतीचे काय होईल? नको तो घटक, नको त्या ठिकाणी, नको त्या वेळी, नको त्या प्रमाणात अस्तित्वात असल्यास त्याला प्रदूषण म्हटले जाते. या क्षेत्रातील वाहतूक माझ्या गावापर्यंत येत असल्याने या क्षेत्रातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. गावातील रस्ते जिल्हा परिषदेतर्फे बांधण्यात येत असल्याने या रस्त्यांची भारक्षमता जास्तीत जास्त १८ टनापर्यंत असते व वाहतूक जवळपास ४० ते ८० टनांपर्यंत असते. त्यामुळे या क्षेत्रातील रस्त्यांची भारनियमन क्षमता वाढविण्यात यावी व त्यानंतरच उत्खननाला सुरूवात करावी. या ठिकाणी ७.५ लक्ष वृक्ष प्रजातींची लागवड प्रस्तावित असलयाचे सांगण्यात आले. परंतु ७.५ लक्ष प्रजातींची लागवड करण्यात येणार आहे किंवा ७.५ लक्ष झाडांची लागवड करण्यात येणार आहे याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. तसेच डेरेदार वृक्षांची लागवड प्रस्तावित आहे. परंतु १२ वर्षांत कोणते झाड डेरेदार होणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीने किमान ४-५ वर्षे झालेल्या झाडांची लागवड केल्यास ती झाडे डेरेदार होऊ शकतात. परंतु कंपनीतर्फे फक्त १ वर्ष जुनी झाडे लावण्यात येतात व ती झाडे जगत नाहीत. कंपनीच्या प्रदूषणामुळे झाडांचे अस्तित्व राहत नाही. वाऱ्याचा वेग कमी करण्यासाठी त्या झाडांचा उपयोग व्हावा. त्यामुळे स्थानिकांना प्रदूषणाचा त्रास होतो. वन विभागाच्या जमीनीचे हस्तांतरण वन विभागाच्या अखत्यारीत येणार आहे. हवेच्या प्रवाहाचा विचार करताना एका बाजूच्या शेतकऱ्यांना मोबदला दिला जातो परंतु हवेच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला कंपनी परिसरालगत असलेल्या शेतकऱ्यांना मोबदला दिला जात नाही. त्याकरिता कितीही उपोषण केले, आंदोलने केली तरी त्याला मोबदला दिला जात नाही. वाऱ्याचा वेग कोणत्या दिशेला वळेल हे सांगता येत नसल्याने प्रकल्पाच्या परिघातील सर्व शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत सुचना सर्व कंपन्यांना द्याव्या. या क्षेत्रातील | |

| | | |
|---|---|---|
| | उत्खननामुळे शासनास मोठ्या प्रमाणात खनिज उत्खनन शुल्क देण्यात येतो. परंतु त्या शुल्काच्या निधीचा फायदा स्थानिकांना मिळत नाही. कारण प्रदूषणाचा त्रास स्थानिकांना होते. प्रदूषणामुळे आमचे रस्ते खराब झाले, शाळा कमकुवत झाल्या आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी जाण्यास तयार नाहीत. जिल्हास्तरावर नियोजन करून स्थानिकांना त्याच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात येते. आमच्या परिसरामध्ये खाणीतून मिळणाऱ्या खनिज उत्खनन शुल्काचा पूर्णपणे वापर जिल्हा विकास निधीमार्फत स्वतंत्र तरतूद करण्यात यावी, ही विनंती करतो. | |

**४) श्री. नागेश मा. धनकसार, सरपंच, ग्रामपंचायत कायर, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सीएसआर निधीमार्फत मे. आरसीसीपीएल या उद्योगामार्फत तीन पंखे व खुर्ची देण्यात येते. त्यास सीएसआर निधी म्हणायचे काय? तसेच कुंभारखणी ग्रामपंचायतीला तेथील खाणीने सीएसआर निधी दिलेला नाही. त्या खाणीच्या क्षेत्रात कायर गाव येत असून आमच्या गावाला देखील निधी देण्यात आला नाही. माझ्या क्षेत्रामध्ये डोलोमाईट खाणी मोठ्या प्रमाणात असून डोलोमाईटची ओव्हरलोड वाहतूक केली जाते. त्यामुळे माझ्या गावातील बस स्थानकाच्या क्षेत्रात वाहतूकीदरम्यान चुरी व दगड पडल्याचे दिसून येते. सदर चुरी व दगड कंपनीमार्फत साफ करण्यात येत नाही. मी, मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे बंधाऱ्यासंदर्भात पत्र व्यवहार केला होता. मा. जिल्हाधिकारी यांनी उन्हाळ्यामध्ये बंधाऱ्याचे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते परंतु आजपर्यंत काम सुरू झालेले नाही. सदर बंधाऱ्यावर कायर परिसरातील ६००-७०० शेतकऱ्यांची शेती अवलंबून आहे. सदर बंधारा किमान १०-१५ वर्षांपासून बंद असून त्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी तोडगा काढला नाही. त्यानंतर मी सिंचन विभागाला देखील पत्र दिले होते. त्यांनी सांगितले की, बंधाऱ्यातील गाळ उपसा करून बंधाऱ्याचे खोलीकरण करण्यात येईल. परंतु त्यांच्याकडूनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. सीएसआर निधीअंतर्गत गावातील | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जनसुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात येत असून त्याचे इतिवृत्त तयार करण्यात येणार आहे. त्यामध्ये कंपनीने दिलेल्या उत्तरांचा देखील समावेश करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | रस्ते, नाल्या, आरोग्य व शाळांचे दुरूस्तीकरण कसे केले जाईल याकडे लक्ष देण्यात यावे. कंपनीमध्ये स्थानिकांना रोजगार देण्यात यावा. तसेच याबाबत कंपनीने लेखी आश्वासन द्यावे. तसेच स्थानिकांना शासनाच्या दरानूसार वेतन देण्यात यावे. तसेच युवकांना नोकरी देताना वैद्यकीय चाचणी होणे देखील गरजेचे आहे. शासन निर्णयानूसार खाण उद्योगामध्ये काम करण्याऱ्या मजुराचे दर दिवसाचे रू. १२००-१३०० इतके वेतन असून त्यांना देण्यात येत नाही. या क्षेत्रातील अनेक खाण उद्योगांमध्ये युवकांना रू. ४००-५०० प्रमाणे वेतन देण्यात येते. तसेच स्थानिकांना रोजगार न देता परप्रांतीयांना रोजगार देण्यात येतो. | |

५) **<u>श्री. रविंद्र सुधाकर पुल्लेवार, मुकुटबन, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे १ एकर जागेमधून अंदाजे रू. ७५.० ते ९०.० कोटींच्या कोळशाचे उत्खनन करण्यात येते. कमी दर्जाच्या कोळशाला रू. ६५.०-७०.० कोटी इतका भाव मिळतो. त्यामुळे रू. ९०.० कोटींपैकी कंपनीने शेतकऱ्यांना रू. ६०.० लाख प्रति एकर प्रमाणे जमीनीचा मोबदला दिला तर त्यात गैर काय आहे? कंपनीने शेतकऱ्यांना रू. ६०.० लक्ष प्रति एकर याप्रमाणे मोबदला द्यावा. शेतकरी संपूर्ण भारत देशाला अन्न पुरवठा करत आहेत. तसेच प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना मा. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत कंपनीमध्ये नोकरी देण्यात यावी. कंपनी जरी बंद झाली तरी त्यांना सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत नोकरी देण्यात यावी. परप्रांतीयांना नोकरीत प्राधान्य देण्यात येऊ नये. कंपनीने त्यांच्या वाहतूकीसाठी वेगळा रस्ता बांधावा जेणेकरून स्थानिकांना प्रदूषणाचा त्रास होणार नाही. मागील २०-२५ वर्षापासून झरीजामणी तहसिलमधील उद्योग बंद अवस्थेत आहेत. सिमेंट कंपनी वगळता बाकी सर्व उद्योग फक्त कागदोपत्री सुरू आहेत. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला त्रास होत असून शेती पडीक आहे. तसेच कंपनीच्या वाहतूकीमुळे झरीजामणी तालुक्यात अपघात झाल्यास मृत व्यक्तिच्या कुटुंबाला रू. ७०.० लक्ष प्रमाणे मोबदला देण्यात यावा. अडकोली गावातील शेतकऱ्यांची शेती एकमुस्त घेण्यात यावी. कंपनीतर्फे सुरूवातील १-२ | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, कंपनीमुळे स्थानिकांच्या जीवनमानावर काय परिणम होईल याबाबत मुद्दे उपस्थित करणे योग्य राहील. बंधाऱ्याबाबत जनसुनावणी संपल्यानंतर सविस्तर चर्चा करण्यात येईल. स्थानिकांनी प्रकल्पाविषयी मुद्दे उपस्थित केल्यास त्याची गंभीरता राहणर आहे. प्रकल्पाव्यतिरिक्त मुद्दे उपस्थित केल्यास मुद्याचे गांभीर्य कमी होते याची कृपया स्थानिकांनी नोंद घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांच्या शेती अधिग्रहीत करतात व बँकांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतात. परंतु कालांतराने कंपनी तोट्यात दाखवून कर्ज माफ करून घेण्यात येते. असे दुष्प्रकार या प्रकल्पामध्ये करण्यात येणार नाही असे मा. जिल्हाधिकारी यांनी कंपनीकडून लेखी आश्वासन घ्यावे. कंपनीने शेतीचे योग्य दर दाखवून शासनाचे मुद्रांक शुल्क अदा करावे. यामध्ये कंपनीने गैरव्यवहार केल्यास कंपनी बंद करण्यात येईल. | |

### ६) श्री. पवन राजेंद्र गोखरे, प्रकल्पग्रस्त, अडकोली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावातील तरूणांना त्याच्या शैक्षणिक पात्रतेनूसार कंपनीच्या पे-रोलवर नोकरी देण्यात यावी. कंपनीने याबाबत जनसुनावणीदरम्यान उत्तर देणे अपेक्षित आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे जुनोलीच्या शाळेचा विषय घेतला होता. त्याचप्रमाणे पवनार येथे देखील शाळा असून बऱ्याच वर्षापासून शाळा बंद आहे. जुनोली येथील शाळेपेक्षा पवनार येथील शाळेची दुरूस्ती करण्यात यावी जेणेकरून स्थानिक विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता दुसऱ्या गावामध्ये जाण्याची गरज पडणार नाही. | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

### ७) सौ. मंगला रंगारी, पवनार, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत होणार असून शेतीमध्ये मजूरी करणाऱ्या शेतमजुरांची मदत करण्यात यावी, ही नम्र विनंती. | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

### ८) श्री. यशवंत बालाजी गोखरे, शेतकरी, पवनार, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावातील ६८ हेक्टर जमीन शिल्लक आहे. काही प्रमाणात जमीन विकून २५ टक्के जमीन शिल्लग राहत आहे. माझी विनंती आहे की, आमच्या गावातील संपूर्ण जमीन कंपनीने अधिग्रहीत करावी. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रदूषण होणार असून शेती करणे कठीण होणार आहे. तसेच सभोवतालच्या जंगलामुळे देखील शेती करणे कठीण होणार आहे. आमची जमीन भोगवटदार-२ ची असल्याने त्यामधून १० टक्के रक्कम कपात करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु प्रशासनाला विनंती आहे की, त्यामधून कोणत्याही प्रकारची रक्कम कापण्यात येऊ नये. पवनार हे गाव कंपनीपासून फक्त ५० मीटर अंतरावर स्थित असल्याने प्रदूषणाचा त्रास होणार आहे. त्यामुळे पवनार या गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. माझी ७५टक्के जमीन कंपनीच्या खाण क्षेत्रात गेली असून उर्वरित २५ टक्के जमीन देखील अधिग्रहीत करण्यात यावी, ही विनंती आहे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

९) **<u>श्री. विनोबा कृष्णा गोन्नाके, गणेशपूर (खु), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी एक एकर शेती अधिग्रहीत केली व त्यापेक्षा जास्त प्रमाणात माती शेतामध्ये पडली तर त्याचा मोबदला आम्हाला काय मिळणार. स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे. परप्रांतीयांना रोजगार देण्यात येऊ नये. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, कंपनीतर्फे खाण क्षेत्रामध्येच खाणकाम करणार आहे. खाण क्षेत्राबाहेर कंपनीला अधिभार ढिगारे टाकता येणार नाही. कंपनीतर्फे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर घेण्यात येणार आहे. |

१०) **श्रीमती नंदा दिपक गोखरे, वडगांव, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत गट क्रं. ३० असून पवनार येथे स्थित आहे. माझे शेत तलावाच्या शेजारी आहे. आम्ही दोन विधवा आहोत. आमचे शेतीचे अधिग्रहण करण्यात आले नहाी. त्याबाबत कंपनीतर्फे विचार करण्यात यावा. माझ्या शेतीचे अधिग्रहण करण्यात यावे. आमची मुले लहान असल्याने शेती करणे कठीण झाले आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, खाणकाम क्षेत्रामध्ये शेत येत असेल तर ते कंपनीतर्फे अधिग्रहण करण्यात येईल. स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी त्यांची मते थोडक्यात मांडावे. काही मुद्दे शिल्लक राहिल्यास त्याबाबत म्हणणे मांडावे. आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे. |

## ११) श्री. विजय आनंदराव पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपणांस विनंती की, मार्की, झरी जामणी, अडकोली कोल माईन्स, ता. झरी, जि. यवतमाळ येथील खाणीकरिता ३५३.५० हे. जमीनीवर कोळसा उद्योग प्रतिवर्ष १.२५ MTPA उत्पादनाकरिता मेसर्स निलकंठ इन्फ्रा मायनिंग लिमीटेड संधुभवन रोड, थलतेज अमदाबाद ३८००५९ गुजरात या कंपनीकरिता पर्यावरणी जनसुनावणी आज दिनांक २३ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या आयोजनाप्रमाणे आपल्या अध्यक्षतेखाली होत आहे. यामध्ये कोळसा खाणकाम उद्योगामुळे वाढते प्रदूषण पर्यावरणाचा ऱ्हास, शेती उत्पन्नात घट, भूमीहीन शेतमजुरांना उपजिविका तसेच जल वायु इत्यादी समस्या निर्माण होणार आहे. कायदे व नियमानूसार होणाऱ्या जनसुनावणीत सत्यमाहिती लोकांना मिळणे आणि त्यावर घेतलेल्या आक्षेपाचा नैसर्गिक न्याय तत्त्वानूसार समावेश करून काही आक्षेप हे कंपनीने दिलेल्या माहितीत उदाहरणासह खोटे आढळल्यास जनसुनावणीत सुचवलेली माहिती दुरूस्ती करून खाणबाधित प्रकल्पग्रस्तांचा फायदा सोबतच होणाऱ्या नुकसानीबाबत जलप्रदूषण प्रतीबंधक व नियंत्रण अधिनियम १९७४, वायू १९८१, घातक घनकचरा नियम १९८९, EIA Notification २००६-२००९ केंद्र व राज्य नियमानूसार न्याय मागण्या व्यवहारिक कायदेशीर दृष्ट्या | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | महत्वपूर्ण आणि समुदाय केंद्रीत आहे करिता न्याय मिळण्यास सहकार्य करावे.<br>१) मार्की, झरी जामणी, अडकोली कोलमाईन्स ता. झरी अधिग्रहण जमीन ३५३.५० हे. यामध्ये जमीनीच्या बदल्यात स्थानिक प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी मॅनेजर, लेखा, सुपरवायझर, कार्मिक प्रबंधक, सामाजिक कार्य, (CSI) कामगार, शिक्षणानूसार कोणत्या वर्गवारीत किती रोजगार देणार आहे त्याची माहिती द्यावी.<br>२) स्त्री पुरूष समानता कायद्यानूसार युवक-युवतींना कोणकोणत्या वर्गवारीत नोकरी प्रमाण ठरविणार आहे याची माहिती द्यावी.<br>३) स्थानिक ३५३.५० हे. वर उपजिविका करण्यासाठी अवलंबित भूमीहीन शेतमजूर, बारा बलुतेदार यांना कायम रोजगार देण्यासाठी कंपनीने काय उपाययोजना केलेली आहे.<br>४) माकी, झरी जामणी, अडकोली कोलमाईन्स, ता. झरी जि. यवतमाळ यांचे अधिकारी जनरल मॅनेजर, उपस्थित आहे का? त्यांनी परिसरातील रोजगार जैवविविधता, सामाजिक, आर्थिक बाबीचा गुंतवणूक करताना विचार केला आहे का?<br>५) खाण परिसरात रिझर्व फॉरेस्ट राखीव जंगल २.६ हे. यामध्ये मौल्यवान औषधी वनस्पती, उपलब्ध वृक्षांचा सर्व्हे केला आहे का? कोणत्या जातीचे वृक्ष आहे याची माहिती द्यावी. त्याच्याबदल्यात राष्ट्रीय हरीत लवाद नियमानूसार किती वृक्ष लागवड (संख्या) करणार आहे?<br>६) खान उद्योग प्रकल्प उद्योग ६२४.७० करोड रूपये यापैकी CSR १% CSR ०.५०% सामाजिक व पर्यावरणदृष्ट्या सामाजिक दायित्व खर्च कायद्यानूसार योग्य आहे काय माहिती द्यावी.<br>७) दरवर्षी १२.५० लाख प्रतिवर्ष कोळसा उत्पादन करणार? त्याची वार्षिक किंमत बाजारभावाने किती येणार? त्यात वार्षिक उलाढाला व खर्च निव्वळ नफा किती राहणार याची माहिती द्यावी.<br>८) मार्की, झरी जामणी, अडकोली कोलमाइन्स ता. झरी येथील कोळसा रेल्वेसायडींग येथे वाहतूक होणार परंतु कोणत्या रस्त्याने होणार, दररोज प्रत्येक गाडी किती टन आणि किती कोळसा ट्रक वाहतूक करणार | |

आणि वाहतूक होणाऱ्या रस्त्याची भार क्षमता किती आहे याची माहिती दिली नाही ती माहिती देण्यात यावी.

९) खाण क्षेत्रात वरच्या भागात डोलोमाईट लाईमस्टोन खनिज साठा उपलब्ध त्याची विल्हेवाट कशी लावणार त्या उत्खननाची रॉयल्टी कंपनी भरणार आहे का याची माहिती देण्यात यावी.

१०) मार्की, झरी जामणी, अडकोली कोलमाईन्स, ता. झरी या माईन्सची आयुष्य मर्यादा बारा वर्ष मग हजारो वर्षे शेतीवर उपजिवीका करणारे शेतकरी शेतमजूर यांना बारा वर्षांनंतर रोजगार कुठे देणार याची माहिती द्यावी.

अ. बारा वर्ष खाणकाम, कॅलेंडर काम माहिती दिली परंतु पाच वर्ष भरपाई, कॅलेंडर काम माहिती देण्यात आली नाही ती देण्यात यावी.

११) मार्की, झरी जामणी, अडकोली कोलमाईन्स ता. झरी येथील जमीन कोणत्या कायद्याने आणि कशाप्रकारे खरेदी करणार आहे यामध्ये पेसा कायदा अंतर्गत येणाऱ्या गावातील जमीनीस भाव देण्याची कार्यपद्धती कायद्यानूसार समजावून सांगावी. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मे. अंबुजा सिमेंटचा नांदगांव एकोडी खाण प्रकल्पाकरिता जमीन खरेदी करताना त्या गावाचा रेडी रेकनर दर २,८८,०००/- होता. बाजार भाव रू. ३०.० लक्ष व त्याला १.२ ने मल्टीप्लाय फॅक्टरने रू. ३६.० लक्ष असे एकूण रू. ७२.० लक्षनूसार जमीनीचा दर देण्यात आला. या परिसरात जमीनीचा रेडी रेकनर दर रू. ६.५१ लक्ष इतका आहे. त्यानूसार या परिसरातील जमीनीला अंदाजे रू. १.५ कोटींपेक्षा जास्त दर मिळायला पाहिजे.

१२) रिझर्व फॉरेस्ट व वन विभाग क्षेत्रात हरीण, लांडगा, सरस, कोल्हा, सांबर रानमांजर, ससा, मुंगुस, वाघ, बिबट इत्यादी महत्त्वपूर्ण वन्यप्राणी यांचा जाण्यायेण्याचा मार्ग अन्नसाखळी याची व्यवस्था उपाययोजना कशी करणार याची माहिती द्यावी.

१३) प्रस्तावित खाण परिसरात बफरझोन खैर, बेल, सिरस, सिसम, तेंदु, बेहडा, उंबर, शेवगा, सिंदी इत्यादी वृख सामुहीक वनहक्क व पारंपारिक वननिवासी यांना उपजिवीकेचे साधन याची

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपाययोजना आपण कशी करणार आहे माहिती देण्यात यावी. वनविकास मंडळाच्या जमीनीवर एकूण झाडांची संख्या किती आहे. मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या नियमानूसार एका झाडाच्या बदल्यात किती झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच पारंपारिक वननिवासी आदिवासी बांधवांना यामधून रोजगाराची संधी उपलब्ध करून देणार आहे काय याची माहिती देण्यात यावी. जर स्थानिकांना सामुहीक वन हक्क पट्टे मिळाले असतील व त्या जमीनीचे अधिग्रहण करताना कोणत्या प्रकारे जमीनीचा मोबदला देण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी.<br>१४) कोळशाची वाहतूक कोणत्या प्रकारे रेल्वे सायडींग पर्यंत करण्यात येणार आहे. कोळसा वाहतूक करताना रस्त्यालगतच्या शेतीचे वाहतूकीच्या प्रदूषणामुळे नूकसान झाल्यास त्याची नूकसान भरपाई कशा प्रकारे करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. कारण सीईआरमध्ये त्याबाबत तरतूद करण्यात आली नाही.<br>१५) सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणात आयटीआय व पदवीधर झालेल्या युवकांचा सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामध्ये इंजिनिअर, डॉक्टर, नर्सिंग झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश नाही. तसेच या परिसरात इंजिनिअर, बी,ए, एम.ए. पास झालेल्या विद्यार्थ्यांचे नांव सांगू शकतो. त्यामुळे असे निदर्शनास येते की, सदर अहवालातील माहिती ही खोटी असल्याचे निदर्शनास येते. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व २००९ नूसार माहिती लपविण्यात येत असेल किंवा खोटी माहिती सादर करण्यात येत असेल तर मा. अध्यक्षांनी सदर प्रकल्पधारकास प्रकल्पाविषयी व परिसराबाबतची संपूर्ण माहिती देण्याचे आदेश द्यावे.<br>सबब विनंती की, झरी तालुक्यातील खनिज संपन्न गावातील उपजाऊ शेतजमीन ६० टक्क्याच्या वर अधिग्रहीत होत असून त्यावर उपजिविका करणारे शेतकरी, बारा बलुतेदार यांचे उपजिविका साधन जमीन ही असून जी कोळसा उद्योगाकरिता संपादित होताना त्यांचा बुडालेला रोजगार व उपजिविका नैसर्गिक न्याय तत्त्वानूसार कायमस्वरूपी राहील याकरिता आपण | |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणी अध्यक्ष या नात्याने उद्योगाने सादरीकरण केलेली माहिती खरी व खोटी आढळल्यास त्यात दुरूस्ती करणे सुचना देणे अशा प्रकल्पग्रस्तांच्या न्याय मुद्दे समावेश करून न्याय द्यावा, ही विनंती. १२ वर्षांनंतर स्थानिक नागरीकांना रोजगार कसा उपलब्ध राहणार आहे. तसेच वर्षानुवर्षे वन संपदेवर अवलंबून असलेला रोजगार कशा प्रकारे देण्यात येईल याची माहिती दिलेली नाही. वंचित झालेल्या रोजगारासाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व मानसिक आणि मानव संसाधनाच्या दृष्टिकोणातून स्थानिक नागरीकांमध्ये जे कौशल्य होते त्या कौशल्यापासून वंचित राहणार आहे. तसेच वन संपदा नष्ट होणार आहे. पर्यायी व्यवस्था करताना ती झाडे पुढील १२ वर्षांमध्ये फळ देणारी होणार आहे का, मध गोळा करू शकणार आहे का? याची माहिती दिलेली नाही. आमचा प्रकल्पाला विरोध नाही परंतु हा प्रकल्प होत असताना स्थानिकांचे पुनर्वसन, उपजिवीका भारतीय संविधानानूसार अबाधित राहू शकणार काय याचा विचार कंपनीने करायला पाहिजे. तसेच पेसा कायद्याचे पूर्णपणे अनुपालन झाले पाहिजे. जसेच जमीन अधिग्रहण कायद्यामध्ये जमीनीची किंमत आहे त्याचप्रमाणे पेसा कायद्याअंतर्गत जमीनीची किंमत देखील देण्यात यावी. मे. निलकंठ इन्फ्रा यांचा प्रकल्प राबविताना रस्ते व नाले कशा प्रकारे वळविण्यात येणार आहे याची माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे या परिसरात भविष्यात पूरपरीस्थिती निर्माण होणार आहे. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांच्या व प्रकल्प प्रवर्तकांनी दर्शविलेल्या नकाशामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. कंपनी त्यांच्या औद्योगिक प्रक्रियेसाठी नाला वळविणार आहे. यामुळे नविन नाल्यामुळे परिसरातील माती खचून जाणार आहे. त्यामुळे परिसरातील शेतीचे नूकसान होणार असल्याने त्याची नूकसान भरपाई कंपनीतर्फे करण्यात येणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. अशा प्रकारे या उद्योगाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये चुका असल्याचे निदर्शनास येते. जमीनीचे दरामध्ये जमीन अधिग्रहण कायदा व पेसा कायद्याअंतर्गत वाढ होणे गरजेचे आहे. आमचा प्रकल्पाला विरोध नाही परंतु कंपनीतर्फे खोटी माहिती सादर करून स्थानिकांची पव प्रशासनाची दिशाभूल केली जाते व नैसर्गिक न्याय तत्त्वास तिलांजली दिल्या जाते. खोट्या माहितीमुळे | |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकांचे शोषण होणार आहे. त्यामुळे माझी मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी कंपनीला त्यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामधील चुका दुरूस्ती करण्याबाबत निर्देशित करावे. | |

## १२) श्री. आशिष आ. फुलसंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद, यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत निळकंठ इन्फ्रा मायनिंग कंपनीच्या जनसुनावणीमध्ये बऱ्याच लोकांनी त्यांच्या अडचणी सांगितलेल्या आहेत. जमीनीच्या दराविषयी, पर्यावरणाची भविष्यात काय परिस्थिती होईल याबाबत स्थानिकांनी त्यांची मते मांडली आहेत. मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना सांगू इच्छितो की झरीजामणी तालुक्यात मे. बी.एस.इस्पात लि. व मे. टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मेटल्स लि., या दोन कोळसा खाणी कार्यरत आहेत. आतापर्यंत या कंपनीने सादरीकरणादरम्यान जमीनीच्या खरेदीबाबत व पर्यावरणीय उपाययोजनांबाबत माहिती दिली. सदर प्रकल्पामध्ये टप्प्या-टप्प्याने २७१ हेक्टर स्थानिकांची जमीन खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे आणि ६८ हेक्टर जमीन प्रकल्पामध्ये नाही. येथे उपस्थित एका व्यक्तिची फक्त १ एकर जमीन खरेदी करण्यात येणार असून उर्वरित १.५ एकर जमीनीबाबत कोणतेही धोरण असल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत त्या शेतकऱ्याने काय करायचे याची माहिती देण्यात यावी. कंपनीतर्फे खाण सुरू झाल्यानंतर स्थानिकांच्या समस्येकडे लक्ष दिले जात नाही. शासकीय अधिकाऱ्यांव्यतिरिक्त कंपनीच्या परिसरात स्थानिक नागरीकांना येण्याची परवानगी दिली जात नाही. आम्ही इस्पात कंपनी बंद केल्यामुळे आमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर इस्पात कंपनीमुळे मुकुटबन, रुईकोट व भेंडाळा या गावांमध्ये प्रदूषण पसरते. परंतु या उद्योगाने त्या गावांमध्ये प्रदूषण नियंत्रण उपाययोजना राबविलेल्या नाहीत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी देखील आजपर्यंत इस्पात कंपनीच्या कोळसा खाणीची पाहणी देखील केलेली नाही. तसेच टॉपवर्थ, आरसीसीपीएल व गणेशपूर येथे कार्यरत असलेल्या चुनखडी खाणी व चुना भट्टी प्रकल्पांना | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी भेट दिलेली नाही. तसेच आम्ही दिलेल्या तक्रारींवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही. सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी ही येणाऱ्या प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणावर कोण-कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे याबाबत स्थानिकांना अवगत करण्यासाठी घेण्यात येत आहे. परंतु अस्तित्वात असलेल्या खाणींनी कोण-कोणत्या उपाययोजना केल्या याबाबत जनसुनावणीमध्ये माहिती का देण्यात येत नाही. मुकुटबन ते चणी दरम्यान असलेली इस्पात कंपनीची खाण बंद असल्याबाबत महाराट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना माहिती नाही. तसेच गणेशपूर येथे कार्यरत असलेल्या उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याबाबत कित्येक वेळो ग्रामपंचायतीने निवेदन/तक्रारी दिल्या, परंतु त्याचे उत्तर आजपर्यंत देण्यात आले नाही. सदर जनसुनावणीमध्ये जमीनीच्या दराबाबत कोणताही निर्णय होत नाही. एका हेक्टर मध्ये किती टन कोळसा उत्खनन करण्यात येते याबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे. या परिसरात जी-८ ग्रेडचा कोळसा आहे. सदर कोळशाला बाजारभाव सर्वात जास्त आहे. एका हेक्टरमध्ये लाखो टन कोळशाचे उत्खनन होत असून स्थानिकांना एकरी रू. २५ लक्ष, ३० लक्ष व ५० लक्षप्रमाणे दर दिला जातो. इस्पात कंपनीमध्ये आजपर्यंत जमीनी अधिग्रहीत करण्यात आलेल्या नाहीत. कंपनीने एकमुस्त जमीन घ्यावी व तसा ठराव पारित करण्यात यावा. कंपनीचे प्रशासन स्थानिकांची फसवणूक करते. आजपर्यंत टॉपवर्थ आणि इस्पातमध्ये जमीन अधिग्रहीत करण्यासाठी स्थानिक नागरीक कार्यालयाच्या फेऱ्या मारतात. परंतु त्याच्या जमीनी अधिग्रहीत करण्यात आलेल्या नाही. या प्रकल्पामध्ये जवळपास ५००-५५० रोजगार देण्याचे प्रस्तावित आहेत. परिसरातील ८०-९० कुटुंबाची जमीन अधिग्रहीत करण्याचे प्रस्तावित आहे व उर्वरित शेतमजूर आहे. परंतु २७१ हेक्टर मधील शेतमजूरांनी काय करावे. त्यांचा उदर्निर्वाह कसा होणार हा प्रश्न उपस्थित होतो. कंपनीतर्फे रू. ५००/- प्रमाणे दैनंदिन मजूरी देण्याचे प्रस्तावित आहे. वे.को.लि.प्रमाणे रू. १२५०/- प्रमाणे स्थानिक मजूरांना रोजंदारी देण्यात यावी. अतिकुशल कामगारांना रू. ३२००/- प्रमाणे दैनंदिन वेतन देण्याचे प्रस्तावित आहे. सदर कंपनी स्थानिकांना वाढीव | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दराने वेतन देणार आहे काय? तसेच ८० कुटुंबातील १००-१५० लोक आहेत. उर्वरित ३५०-४०० मनुष्यबळ कुठून घेण्यात येणार आहे? कंपनीने याबाबत माहिती द्यावी. कंपनीतर्फे महाराष्ट्र शासनाच्या ८० टक्के स्थानिक नागरीकांना रोजगार देण्याच्या नियमांचे पालन करण्यात येत नाही. हा प्रकार येथील सर्व उद्योगांमार्फत घडत आहे. भविष्यात या परिसरात देखील तसेच घडणार आहे. कंपनीतर्फे आरोग्य विषयक सुविधा पूरविण्याचे आश्वासन देण्यात येते परंतु ते फक्त कागदापर्यंत मर्यादित राहतात. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही. सीएसआर अंतर्गत फक्त खुर्च्या व पंखे देण्यात येतात. परिसरातील एकाही उद्योगाने परिसराकरिता रूग्णवाहिकेची सुविधा पूरविलेली नसून त्याबाबत प्रशासनातर्फे कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही. कंपनीने खोटी माहिती सादर केली आहे. या परिसरामध्ये वन्यजीवाचे अस्तित्व नसल्याची खोटी माहिती देण्यात आली आहे. परंतु या परिसरामध्ये वाघाचे अस्तित्व आहे. कंपनीतर्फे फक्त खोटी आश्वासने दिली जातात. त्यांची अंमलबजावणी करण्यात येत नाही. एका इसमाचा अपघातात मृत्यू झाला होता परंतु कंपनीने त्यांच्या परिसरात मृत्यू झाला नाही असे कारण देऊन त्या प्रकरणातून हात काढण्याचा प्रयत्न केला. त्याविरोधात आंदोलन केल्यानंतर त्याबाबत कार्यवाही करण्यात आली. तसेच स्थानिकांना गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला. आम्ही त्याबाबत पाठपुरावा केल्यानंतर सदर मृत इसमाच्या नातेवाईकांना मोबदला देण्यात आला. त्यांच्या परिसरात मृत इसमाची जबाबदारी कंपनी घेत नाही. मुकुटबन येथून बाजाराच्या दिवशी वाहतूक वळविण्याबाबत मा. पोलिस निरीक्षक यांचेकडे निवदन देण्यात आले आहे. तसेच कंपनीला ठरवून दिलेल्या वेळेवर वाहतूक करण्यात येत नाही. वणीपर्यंत तयार करण्यात आलेल्या रस्त्याची वाहतूकीमुळे अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. या सर्व समस्यांबाबत प्रश्न उपस्थित केल्यास उत्तरे मिळत नाहीत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे झरी जामणी तालुक्यातील उद्योगांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत असल्याबाबत मी मा. पंकजा मुंडे, मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांची भेट घेणार आहे. स्थानिकांचे आरोग्य खराब झाले आहेत. | |

| | | |
|---|---|---|
| | तसेच शेतीवर देखील विपरीत परिणाम झाला आहे. प्रत्येक कंपनीच्या परिसरालगत १०-१५ एकर परिसरातील शेती प्रदूषणामुळे खराब झाली आहे. कंपनीने उर्वरित असलेली ६८ हेक्टर जमीनीचे अधिग्रहण करावे. कंपनीने २७१ हेक्टर व ६८ हेक्टर जमीनीची जनसुनावणी घ्यावी. कंपनीतर्फे ७.५ लख झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे परंतु झाडे लावण्याच्या परिसराचा उल्लेख केलेला नाही. आजपर्यंत या परिसरातील एकाही खाणीने झाडे लावलेली नाहीत. कोळसा खाणीतून कोळसा खुल्या बाजारात विकण्याचा कंपनीला अधिकार आहे. कंपनीला जर या उद्योगातून मोठा नफा मिळणार असेल तर जमीनीला जास्त किंमत द्यायला अडचण काय आहे. कंपनीतर्फे कोणत्याही प्रकारच्या सुविधा पूरविण्यात येत नाहीत. आरसीसीपीएल कंपनीने आजपर्यंत रूग्णवाहिकेची सुविधा पूरविलेली नाही. या कंपनीतर्फे वन विभागाची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे. त्याबदल्यात कोणत्या ठिकाणी जमीन उपलब्ध करून देणार आहेत. कंपनीने रायगड, रत्नागिरी येथे जमीन विकत घेतल्याची माहिती मिळाली आहे. कंपनीने रत्नागिरी किंवा रायगड ऐवजी झरीजामणी तालुक्यातील शेतकऱ्यांची जमीन विकत घ्यावी व तेथे जंगल विकसित करावे. वणी तालुक्यामध्ये उप-जिल्हा रूग्णालय उपलब्ध नाही. मुकुटबन येथे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कालबाह्य औषधी आहेत. तसेच आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर उपलब्ध राहत नाहीत. या सर्व गोष्टींचा त्रास झरीजामणी तालुक्यातीन नागरीकांना होत आहे. तसेच चिलई येथील रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. कंपनीने त्यांच्या वाहतूकीच्या रस्त्याबाबत माहिती दिलेली नाही. ग्रामीण रूग्णालय झरीजामणी येथे पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. तसेच उन्हाळ्यामध्ये कुलर देखील पूरविण्यात आले नाहीत. माझी शेतकऱ्यांना विनंती आहे की, कोणच्या भूलथापांना बळी पडू नका व जर कंपनी एकमुस्त पद्धतीने जमीन खरेदी करत असेल तरच जमीनी विकाव्या अन्यथा प्रकल्पाला जमीनी देऊ नका. | |

**१३) श्री. नितेश वामनराव लेनगुरे, प्रकल्पग्रस्त शेतकरी, अडकोली, ता. झरीजामणी, यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अडकोली आणि पवनार या गावांमध्ये जी ६८ हेक्टर जमीन सरसकट सुटलेली नाही. त्यामध्ये एका शेतकऱ्याची १ एकर जमीन अधिग्रहीत केली व दुसऱ्या शेतकऱ्याची १.५ एकर जमीन अधिग्रहीत केली व त्यापैकी काही एकर जमीन शिल्लक राहिलेली आहे. यामधून कंपनीचा वाईट हेतु सिद्ध होत आहे. तसेच जमीन सुटायचे कारण काय याची माहिती देण्यात यावी. आमच्या गावातील जमीनीतून ६-७ क्विंटलपेक्षा जास्त कापसाचे उत्पन्न होत नाही. प्रदूषणाचा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. मागील ३-४ वर्षांमध्ये ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये भोगवटदार-२ ची जमीन असल्याने पुढील प्रक्रिया करता येणार नाही अशी माहिती मिळली. कंपनीने एकीकडे सर्व प्रक्रिया पार पाडल्या परंतु दुसरीकडे स्थानिक शेतकऱ्यांना डावलण्याचे काम करत आहे. ग्रामसभेमध्ये कंपनीने शाश्वत माहिती सादर केलेली नाही त्यामध्ये जमीनीच्या दराबाबत देखील माहिती दिलेली नाही. परिसरातील ९० टक्के जमीन अधिग्रहीत केल्यानंतर या ठिकाणी कोणीही वास्तव्यास राहणार नाही. दुसऱ्या ठिकाणी जमीन विकत घेणे, घर पण बांधावे लागेल. आमची जमीन चालली म्हणजे आमच्या आयुष्य पनाला लागणार आहे. त्यामुळे स्थानिकांचे भवित्व्य अधांतरी राहायला नको. आपली न्यायालयीन व्यवस्था धिम्या गतीने काम करत असल्यामुळे शेतकरी टिकू शकत नाही हे कंपनीला माहिती आहे. मागील २ वर्षांपासून ग्रामसभा होत आहेत परंतु आजपर्यंत जमीनीच्या दराबाबत निर्णय झालेला नाही. तसेच सदर जमीनीचा व्यवहार कशा पद्धतीने होणार आहे याची माहिती मिळालेली नाही. सुरूवातीला असे सांगण्यात आले होते की, जमीनीचा दर सरसकट ठरविण्यात येणार असून त्यानूसार सर्व ग्रामस्थांना मोबदला मिळणार आहे. त्यानंतर वाटाघाटी करण्याचे ठरले. परंतु वाटाघाटीचे नेमके स्वरूप काय आहे याची माहिती मिळालेली नाही. तसेच एखाद्या अधिसूचनेची प्रत देखील आम्हाला प्राप्त झालेली नाही. कंपनीचे मालक प्रत्येक गावकऱ्यासोबत चर्चा करून प्रत्येक गावकऱ्याची जमीन वेगवेगळ्या दरामध्ये खरेदी | मा. उप-विभागीय अधिकारी, झरीजामणी, जि. यतवमाळ यांनी सांगितले की, उपस्थितांना विनंती आहे की, वारंवार एकच मुद्दा उपस्थित करण्यात येऊ नये. कंपनीतर्फे सर्व मुद्यांचे उत्तर घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | करणार असल्याची स्थानिकांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे कंपनीने त्यांच्यातर्फे तयार करण्यात आलेल्या प्रत्येक प्रस्तावाची प्रत ग्रामपंचायतीकडे सादर करून त्याबाबतची माहिती ग्रामस्थांना देण्यात यावी. जमीनीच्या दराबाबत कंपनीने गावकऱ्यांसोबत ग्रामसभेदरम्यान चर्चा करून सरसकट दर निश्चित करावा, ही आमची मागणी आहे. तसेच गावकऱ्यांसोबत वैयक्तिक वाटाघाटी केल्यानंतर एकमेकांना त्यांना मिळालेल्या मोबदल्याची रक्कम जाहीर न करण्याचे देखील सांगण्यात आले असल्याची चर्चा आहे. आमची मागणी आहे की, कंपनीने एक रकमी व्यवहार केला पाहिजे. तसेच सर्व जमीनधारकांचे दर सार्वजनिक करण्यात यावे. | |

### १४) श्री. वासुदेव लक्ष्मण विधाते, मार्की (बु.), ता. झरीजामणी, यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | देशाचा विकास झाला पाहिजे हे सर्वांनाच वाटते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. पण खरच या देशातील शेतकरी स्वतंत्र झाला काय हा मूळ प्रश्न आहे. हा प्रश्न अनुत्तरीत आहे. या देशाचा शेतकरी अजूनही स्वतंत्र झालेला नाही. देशाच्या विकासासाठी ऊर्जेची गरज आहे, हे आम्हाला देखील मान्य आहे. ऊर्जेची गरज पूर्णत्वास न्यायची असल्यास अशा प्रकल्पांना मंजूरी मिळणे देखील गरजेचे आहे. याची जाण सर्व शेतकऱ्यांना व सर्व सामाजिक कार्यकर्त्यांना आहे. परंतु अशा प्रकल्पाचे प्रकल्प शेतकऱ्यांच्या जीवावर उभारत असताना शेतकरी या प्रकल्पांच्या खाली गाडल्या जातो आहे हा माझा स्पष्ट आरोप आहे. तुम्ही झारखंड मध्ये इतर ठिकाणी गेल्यास तुम्हाला हीच परिस्थिती दिसेल. मागील २५-३० वर्षांपासून आम्ही या मुद्याबाबत लढा देत आहो. या परिसरातील कोळसा खाण प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना कोणता फायदा झाला हे शासनाने आम्हाला सांगावे. या परिसरात मार्की मांगली कोळसा ब्लॅकचे एकूण ४ प्रकल्प आहेत. यापूर्वी मे. यझदानी या प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यात आली आहे. मी यापूर्वी देखील आपणासमक्ष हा मुद्दा उपस्थित केला होता की, पर्यावरण विषयक जनसुनावणी झाल्यानंतर अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीतर्फे किंवा महाराष्ट्र प्रदूशण नियंत्रण मंडळातर्फे परिसरातील एकाही ग्रामपंचायतीला किंवा शेतकऱ्यांना देण्यात येत नाही. आपण मागच्या वेळेस आम्हाला आश्वासन दिले होते की, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत देण्यात येईल. परंतु तसे काही झाले नाही. मागील जनसुनावणीदरम्यान देखील हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. ज्या प्रकारे प्रारूप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत जनसुनावणीच्या पूर्वी ग्रामपंचायतींना देण्यात येते त्याच प्रमाणे अंतिम अहवालाची प्रत देखील देण्यात यावी. ही जबाबदारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची असून ती जबाबदारी मंडळातर्फे पाळली जात नाही, हा आमचा आक्षेप आहे. या प्रकल्पाचा अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल परिसरातील १७-१८ ग्रामपंचायतीमध्ये पोहोचविण्यात येईल अशी आमची आशा आहे. या परिसरातील १० कि.मी. त्रिज्येमध्ये मार्की मांगली कोल ब्लॉक्स व आरसीसीपीएलचा प्रकल्प आहेत. या ५ प्रकल्पांचे बफर झोन ओव्हरलॅप होत आहेत. त्यामुळे आमची मागणी आहे की या १० कि.मी. क्षेत्रातील प्रकल्पांची प्रकल्पनिहाय जनसुनावणी घेण्यापेक्षा या सर्व प्रकल्पांचा एकत्रित पर्यावरण मुल्यांकन अहवाल तयार करून जनसुनावणीची प्रक्रिया पूर्ण करून एकत्रित पर्यावरण मंजूरी घेण्यात यावी. या प्रकल्पाकरिता स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनूसार जमीनीचा दर ठरवून शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळालाच पाहिजे. झरीजामणी पसिरातील परिसर हा मोठ्या प्रमाणामध्ये पेसाच्या Article २४४ Schedule-V मध्ये येतो. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात शेतमजूर असून ते आदिवासी आहे. अशा शेतमजूरांकरिता प्रकल्पधारक कोणत्या उपाययोजना करणार आहेत याचे उत्तर देण्यात आले नाही. अडकोली, पवनार येथील शेतमजूर झरीजामणी, मार्की या सारख्या ठिकाणी शेतमजूरीकरिता जाऊ शकतो. परंतु त्या ठिकाणी देखील कोळसा खाण प्रकल्प कार्यरत असल्याने तेथील शेतीवर देखील विपरीत परिणाम होत आहे. या परिसरातील आदिवासी शेतमजूरांकडे उत्पन्नाचे दुसरे साधन उपलब्ध नाही. तसेच पेसा कायद्याअंतर्गत आदिवासी बांधवांना वन हक्क देण्यात आले आहेत. त्या वन हक्काचे प्रकल्पधारकातर्फे उल्लंघन होत आहे किंवा कसे याबाबत देखील तपासणी करायला पाहिजे. परंतु या | |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पामध्ये तसेच या क्षेत्रातील इतर प्रकल्पांमध्ये त्याबाबत कोणत्याही प्रकारची तरतूद किंवा नियोजन करण्यात आलेले नाहीत. गेल्या २० वर्षांपासून हा अन्याय आम्ही अनुभवत आहे. जनसुनावणीदरम्यान आश्वासने दिली जातात व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात देखील आम्हा स्थानिकांना सन्मानजनक वागणूक मिळत नसल्याचा आमचा मागील २० वर्षांचा अनुभव आहे. खाण परिसरालगत असलेल्या शेतीचे देखील खाणकामामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे नूकसान होत असल्यामुळे शेतपिक नूकसान भरपाई शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनातर्फे धोरण ठरविण्याचे काम प्रगतीपथावर असुन त्याकरिता महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांचा दौरा नजिकच्या काळात पार पडल्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. इतर लोकांबाबत देखील प्रयत्न व्हायला पाहिजे. पेसा कायद्यामध्ये आदिवासींची जागा बिगर आदिवासींच्या नावावर हस्तांतरण करण्याकरिता काही बंधन आहेत. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व प्रकल्पधारकाकडे कोणते नियोजन किंवा तरतूद आहे याबाबत माहिती देण्यात यावी. या प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये वनजमीन, आदिवासी जमीन, खाजगी जमीन, FDCM (महाराष्ट्र वन विकास महामंडळ) जमीन आणि शासकीय जमिनीचे वर्गीकरण करण्यात आले आहे. परंतु खाजगी जागेचे देखील वर्गीकरण होण गरजेचे होते. त्यामध्ये जातीनिहाय खाजगी जमीन किती याचे वर्गीकरण होणे देखील गरजेचे आहे. त्यामुळे त्या आदिवासी बांधवांच्या संवैधानिक अधिकारांचे उल्लंघन झाले नसते. ती व्हायला पाहिजे अशी माझी मागणी आहे. त्यामुळे पेसा कायद्याअंतर्गत त्यांच्या अधिकार राखले जाऊ शकले असते. पेसा कायद्याअंतर्गत पेसा क्षेत्रात प्रकल्प उभारायचा असल्यास त्या परिसरातील ग्रामपंचायतींची सहमती घेण्यात अत्यांत आवश्यक आहे. या प्रकल्पाने ग्रामपंचायतींची सहमती खोटी मांडणी व दिशाभूल करणारी माहितीच्या आधारे प्राप्त करण्यात आली आहे हा माझा आरोप आहे. ग्रामपंचायतींकडून दबावतंत्राचा वापर करून सहमती घेण्यात आली असल्याचा माझा आक्षेप आहे. त्याची चौकशी करण्यात यावी व परत ग्रामसभा आयोजित करून कोणत्याही दबावतंत्राचा वापर न करता सहमती घेण्यात यावी ही | |

| | | |
|---|---|---|
| | माझी मागणी आहे. शेड्युल-५ मधील या ग्रामपंचायती असून त्यांचा निर्णय सर्वोच्च आहे व कोणतीही न्यायप्रक्रिया प्रसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या निर्णयाला बाधा आणू शकत नाही. ग्रामपंचायतींची सहमती खोटी मांडणी व दिशाभूल करणारी माहितीच्या आधारे प्राप्त करण्यात येत असेल तर ते घटनेचे उल्लंघन आहे, त्याची चौकशी व्हायला पाहिजे. ग्रामसभेच्या ठरावामध्ये ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेची माहिती असायला पाहिजे. सदर माहिती या ठरावांमध्ये नसल्याने यामध्ये काहीतरी गौडबंगाल करून ठराव पारीत करून घेतल्याची शक्यता नाकरता येत नाही. याची चौकशी होणार आहे काय. याबाबत ग्रामपंचायतीकडे व प्रशासनाकडे उत्तरे मिळत नाहीत. या क्षेत्रातील आदिवासींची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार असून वन हक्क कायदा २००६ नूसार काही दावे प्रलंबित आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच जे दावे प्रलंबित आहेत त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे किंवा येणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी. गेल्या अनेक वर्षापासून या क्षेत्रात वाघांचे अस्तित्व आहे. हे क्षेत्र वाघांचे भ्रमणमार्ग आहे. हो कॉरीडोर टिपेश्वर अभयारण्यापासून सुरू होऊन तेलंगणा येथील कागल टायगर रिझर्व, खाली ताडोबा अंधारी प्रकल्प व छत्तीसगढ येथील इंद्रावती टायगर रिझर्व पर्यंत पसरलेला असून या सर्व टायगर प्रकल्पांना जोडणारा भाग आहे. वाघ हा वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या अनुसूची-१ मधील संकटग्रस्त (Endangered) प्रजाती म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यांना वाचविण्यासाठी प्रकल्पधारकातर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात आलेली नाही. या क्षेत्रातील वन्यजीव कुठे जाणार आहे याची माहिती दिलेली नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, "There is a tiger movement in this area, not only in this project area but also in the entire Zarijamni, You are, nowhere, sanctioned this project." अशा परिस्थितीत मे. आरसीसीपीलच्या खाण प्रकल्पाला ४७२ हेक्टर जंगल दिले गेले. खाणकाम सूरू करण्यात आले आहे. सदर प्रकल्पाला राज्य वन्यजीव समितीची दोन वेळा पाहणी झाली व सदर ४७२ हेक्टर वन जमीन सदर प्रकल्पाला देण्यात येऊ नये असा स्पष्ट अहवाल राज्य | |

| | | |
|---|---|---|
| | वन्यजीव मंडळाकडे सादर करण्यात आला आहे. असे असून देखील राज्य वन्यजीव मंडळाचे अध्यक्ष मा. मुख्यमंत्री महोदयांनी सदर जमीन कंपनीला दिली आहे. सन २०११ पासून २०२३ पर्यंत पशुधनाच्या हत्या किती झाल्या, मानव व वन्यजीव संघर्ष किती झाले, तसेच त्याची नूकसान भरपाई किती मिळाली याचा नाव, धनादेश क्रमांक सहीत तपशील मागील जनसुनावणीमध्ये सादर केलेला होता. त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली याची माहिती मिळालेली नाही. वन विभागानूसार वाघ ही प्रजाती ही फार कमी असल्याने त्याचे पुनर्वसन आपण कसे करणार याची माहिती दिलेली नाही. वाघांचा भ्रमणमार्ग बदलणार तर तो कसा बदलणार. रानडुक्कराने शेतीचे नूकसान केले तर त्याची नूकसान भरपाई देण्यात येते. तसेच अस्वलच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास रू. २५.० लक्ष, अपंगत्व आले असल्यास रू. ५.० लक्ष आणि किरकोळ जखमी झाल्यास रू. ५०,०००/- पर्यंत नूकसान भरपाई मिळते. परंतु या सर्व बाबी शेतकऱ्यांसोबतच घडतात व त्यचा त्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच कंपनीने शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला द्यायला पाहिजे ही माझी स्पष्ट मागणी आहे. खाणकाम पूर्ण झाल्यानंतर खाण बंद करण्याची योजना कंपनीने दिलेली आहे. परंतु खाणकाम बंद झाल्यानंतर ती जमीन कोणत्या विभागाकडे हस्तांतरीत होणार याची माहिती आम्हाला मिळायला पाहिजे. कंपनीकडे रोजगाराबाबत कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक वचनबद्धता आहे किंवा कसे याची माहिती देण्यात यावी कारण स्थानिकांना रोजगार देण्यात येतो. परंतु काही दिवसांनी त्यांना कामावरून काढून टाकण्यात येते. कंपनी रोजगाराबाबत कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक वचनबद्धता स्थानिकांना देणार काय याची माहिती देण्यात यावी. | |

**१५) <u>श्री. समीर चंद्रशेखर लेनगुरे, अडकोली, ता. झरीजामणी, यवतमाळ:-</u>**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | देशाला स्वातंत्र्य होऊन ७९ वर्षे झाली. पुढील काही दिवसात ८०वा स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहे. परंतु ८० वर्षांनंतर देखील झरीजामणीहून वणी जाणरी एसटी आगाराची गाडी पवनार येथे थांबविण्यासाठी १०० निवेदने | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | द्यावी लागतात. त्यानंतर देखील प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष करण्यात येते. स्थानिक नागरीकांना पवनार येथून ३ कि.मी. अंतरावर असलेल्या बस स्थानकापर्यंत जावे लागते. या प्रकल्पामुळे स्थानिकांना आनंद व दु:ख आहे. परंतु दु:ख फार जास्त आहे. याला शासन जबाबदार आहे. आमच संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून आहे. या क्षेत्रात कापूस व सोयाबीन ही प्रामुख्याने पिके घेतली जातात. शेतजमीन अधिग्रहीत केल्यानंतर शेतकऱ्यांच्या उदर्निर्वाहाचा प्रश्न निर्माण होतात. आमच्या शेजारी कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात नोकरी देण्यात आली परंतु त्याच पद्धतीने त्यांना कामावरून कमी करण्यात आले. कारण कामगारांना कंत्राटी पद्धतीने घेण्यात आले होते. कंत्राटदारातर्फे कामगारांना कधीच शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन दिले जात नाही. तसेच पगार वाढीकरिता स्थानिक कामगारांना इतर ठिकाणी त्या कंत्राटदारामार्फत जावे लागते. मे. आरसीसीपील कंपनीमध्ये असलेल्या सुरक्षा रक्षकांना १२ तासांची नोकरी करावे लागते. नियमानूसार ८ तासांची नोकरी ३ शिफ्टमध्ये असायला पाहिजे. सुपरवायझरसोबत चर्चा केली असता याबाबत कुठेच ताळमेळ होत नसल्याचे लक्षात आले. कंपनीतर्फे रोजगारासंदर्भात कोणत्या तरतूदी करण्यात येणार आहेत तसेच कोणत्या तरतूदींवर काम करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. गावातील जमीन अधिग्रहीत केल्यानंतर तेथे राहणाऱ्या स्थानिकांना जो त्रास होणार आहे त्याबाबत कंपनीतर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीला देण्यात येणाऱ्या विविध ना-हरकत प्रमाणपत्रांमध्ये नमूद नियमांचे पालन कंपनीतर्फे करण्यात येत नसून प्रशासन देखील त्याकडे दुर्लक्ष करते. एखाद्या व्यक्तिने विषय धरून ठेवला तर त्यासोबत कंपनीतर्फे सेटलमेंट करून त्याला शांत केले जाते. मे. बी.एस.इस्पात कंपनीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आजपर्यंत कुठलेही उत्तर मिळालेले नाही. माझी मागणी आहे की, या प्रकल्पामध्ये शासनाच्या सर्व नियमांचे काटेकारपणे पालन करण्यात यावे. कंपनीचे प्रतिनिधी गावांमध्ये कार्यालयीन वेळेतच यावे व त्याबाबतची माहिती सर्व ग्रामस्थांना होणे गरजेचे आहे. आजच्या काळातील जमीनींच्या दराचा विचार केला तर | |

| | | |
|---|---|---|
| | या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमीनीला किमान रू. ६०.० लक्ष एकर प्रमाणे मोबदला देण्यात यावा. | |

**१६) श्री. अजय पांडुरंग धोबे, नगरसेवक प्रभाग क्रं.१, नगर परिषद वणी, ता. वणी, यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी मारेगांव या गावाचा रहिवासी असून त्या ठिकाणी सन २०१२ मध्ये अशाच प्रकारची जनसुनावणी घेण्यात आली होती. त्याठिकाणी ज्या शेतकऱ्यांकडे ७-२० एकर जमीनीचा मालक होता आज तोच शेतकरी २-२.५ एकर जागेचा मालक आहे आणि त्या ठिकाणी प्रकल्पाचा पत्ताच नाही. म्हणून याठिकाणच्या शेतकऱ्यांना एवढेच सांगणे आहे की प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी प्रकल्पावर अवलंबून राहू नये. ज्या नगरपरिषदेचा मी नगरसेवक आहे तो भाग भाग देखील कोळशाने बाधित आहे. या परिसरातील कोळसा वाहतूक करून लोडींग अनलोडींग करिता वणी येथे आणण्यात येतो व वणी नगरपरिषदेचा प्रभाग कोळशाने बाधित आहे. सदर परिसरात किती प्रमाणात प्रदूषण होत आहे याची जाणीव मला आहे. यापूर्वी देखील मा. प्रधान सचिवांच्या दौऱ्यावेळी देखील ही बाब मा. जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिली होती. या प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद आहे की मार्की झरीजामणी अडकोली कोळसा खाणीतून निघणाऱ्या कोळशाची वाहतूक येथून १९.३० कि.मी अंतरावर स्थित सर्वात जवळच्या कायर रेल्वे सायडींग येथे करण्यात येणार आहे. परंतु सदर वाहतूक कोणत्या मार्गाने करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात आलेली नाही. ज्या रस्त्यावरून कोळशाची वाहतूक करण्यात येणार आहे त्याची भारनियमन क्षमता किती आहे याची माहिती देण्यात आलेली नाही. सदर प्रकल्प १२ वर्षे कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु आज ज्या युवकांचे वय ३० वर्षे असेतील तर १२ वर्षांनंतर त्यांचा उदर्निर्वाह कशा प्रकारे करतील याची माहिती देण्यात आलेली नाही. सदर प्रकल्पाच्या सीएसआर व सीईआर अंतर्गत अंदाजे रू. ९.० कोटींची तरतूद प्रस्तावित आहे. परंतु कंपनीतर्फे त्या रू. ९.० कोटींची बँक हमी ग्रामपंचायतींना कंपनीतर्फे देण्यात येणार आहे काय याची माहिती देण्यात यावी. या | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | व्यतिरिक्त खाणीतून बाहेर पडणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करणे, कंपने आवाज कमी करण्यासाठी नियंत्रित स्फोट तंत्र आणि नियमक मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी नियमित पर्यावरण देखरेख यांची तरतूद करण्यात आली अअसल्याचे नमूद आहे. सन १९०६ पासून कोळशाचे प्रकल्प या वणी परिसरात सुरू झाले असून त्यामुळे हे सर्व प्रश्न उपस्थित करणे योग्य आहे. वृक्षारोपणाकरिता प्रति हेक्टर २५०० झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे. वन विभागाच्या सल्ल्यानूसार फळ झाडांसह स्थानिक प्रजातींची सुमारे ७६६८४५ झाडे लावण्याचे प्रस्तावित असून ती झाडे कोणत्या क्षेत्रात लावण्याचे प्रस्तावित आहे याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि.च्या रल्वे सायडीं संदर्भात पत्रव्यव्हार केला असता त्यांनी देखील ११०८७ झाडे लावली असल्याचे सांगितले परंतु त्या ठिकाणी एकही झाड जिवंत असल्याचे निदर्शनास आले नाही. या ठिकाणी १३ हेक्टर क्षेत्रात झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे. परंतु जर ७६६८४५ झाडांची १३ हेक्टर क्षेत्रात विभाग करतेवेळी असे लक्षात येते की प्रति हेक्टर सुमारे ५८९८८ झाडांची लागवड व्हायला पाहिजे. परंतु तसे होताना दिसत नाही. सदर आकडे वारी कोणत्या आधारे करण्यात आली आहे याची माहिती देखील देण्यात यावी. कोळसा उत्पन्नाचा खर्च बाजारभावापेक्षा कमी आहे त्यामुळे वीज ग्राहकांना अधिक फायदा होणार असल्याचे नमूद आहे. मागील १२० वर्षांपासून कोळशाच्या दुष्परिणामांबाबत लढा देत असून वीज ग्राहकांना कोणता फायदा झाला याची माहिती देण्यात यावी. बरेच दिवसांपासून स्थानिकांची मागणी आहे की, कोळसा बाधित क्षेत्रामध्ये वीज बिलचे दर कमी करण्यात यावे. यासह अनेक प्रश्नांबाबतचे निवेदन मी मा. जिल्हाधिकारी व प्रकल्प प्रवर्तकांकडे सादर केले असून त्याचा विचार व्हावा व त्याचे समाधानकारक उत्तर देण्यात यावे ही विनंती. तसेच लेखी उत्तर व सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यानंतर सदर प्रकल्पास मंजूरी देण्यात यावी, ही विनंती. | |

## १७) श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | वेळेच्या अभावी मी माझे लेखी निवेदन सादर करीत आहे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

## १८) श्री. राहूल सुनिल पावडे, मोहदा, ता. वणी, जि. यतवमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझे गाव गिट्टी क्रशरसाठी प्रसिद्ध असून मोठ्या प्रमाणात गिट्टी क्रशर कार्यरत आहेत. मी प्रकल्पबाधित शेतकरी आहे. माझ्या गावालगत सन २००८ पासून क्रशर सुरू असून मी आजपर्यंत शेती विकलेली नाही. मी क्रशरबाबत आक्षेप घेतला होता व त्या ठिकाणी पटवारी साहेबांची पाहणी झाली. मे. बालाजी असोसिएट मोहदा या उद्योगाची वाहतूक त्या रस्त्यावरून होत असून त्यामुळे आम्हाला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. माझ्या आई वडीलांनी प्रकल्पाविरोधात आवाज उठवला असता त्यांना पोलिस प्रशासनाकडून नाहक त्रास दिला जातो. माझ्या शेतीलगत एकूण ०३ क्रशर उद्योग असून दोन्ही बाजूंनी वाहतूक करण्यात येते. क्रशरच्या प्रदूषणामुळे माझ्या आई वडीलांना आरोग्यविषयक समस्या उद्भवलेल्या आहेत. पोलिस प्रशासनाकडे कुठल्याही प्रकारची तक्रार नसताना त्रास दिला जातो. क्रशरमुळे घरांना तडे जात आहे. या प्रकलपामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना विनंती आहे की, जमीनीचा दर किमान रू. १.० कोटी मिळाल्याशिवाय जमीन अधिग्रहीत करू देऊ नये. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, याबाबत योग्य ती चौकशी करण्यात येईल. या प्रकल्पाविषयी आपले काही म्हणणे असल्यास ते मांडण्यात यावे. प्रकल्पाव्यतिरिक्त इतर मुद्यांबाबत आपणासोबत सविस्तर चर्चा करण्यात येईल. |

## १९) मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | वणी परिसरातील प्रदूषणाच्या मुद्याबाबत प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वेळोवळी वणी परिसरातील उद्योगांची पाहणी करावी. प्रदूषणाच्या तक्रारींचा वेळोवेळी निपटारा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपविभागीय कार्यालय व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संगनमताने वणी तालुका व यवतमाळ जिल्ह्यातील इतर तालुक्यांमधी प्रदूषण कसे कमी करता येईल याकडे लक्ष द्यावे. त्याकरिता आठवड्यातील एक दिवस निश्चित करून घ्यावा जेणेकरून स्थानिक नागरीकांच्या तक्रारींचे व |

| | |
|---|---|
| | समस्यांचे निराकरण करणे शक्य होईल. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी सादरीकरणाव्यतिरिक्त इतर मुद्यांबाबत त्यांचे म्हणणे मांडावे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पाचा अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल ग्रामपंचायतींकडे पुढील १५ दिवसांमध्ये सादर करावा. |

२०) **प्रकल्प प्रवर्तकांतर्फे पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | ७५०००० झाडांची लागवड ३०० हेक्टर जमीनीमध्ये टप्प्या-टप्प्याने करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाच्या अहवालामध्ये खाणीचे पुनर्भरण करण्याचे देखील प्रस्तावित आहे. तसेच जमीनीच्या धुपबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता, त्याबाबत देखील अहवालामध्ये नमूद आहे. या प्रकल्पातून प्रतिदिन १८९ वाहनांची वाहतूक दाखविण्यात आली असून त्याचे नियोजन देखील करण्यात आले आहे. या परिसरामध्ये चुनखडी व डोलोमाईट नसल्याने त्याचा प्रश्न उद्भवत नाही. वाघाच्या दळणवळणाबाबत व वन्यजीव संवर्धनाबाबत सखोल अभ्यास करण्यात आलेला असून वन विभागाकडून फक्त Schedule-१ मध्ये येत असलेल्या २४ प्राण्यांची यादी मिळाली होती. वन्यजीव संवर्धनामध्ये Schedule-१ मध्ये येत असलेल्या २७ प्राण्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याकरिता रू. २.० कोटींची तरतूद करण्यात आली असून सदर अहवाल मंजूरीकरिता सादर करण्यात आला आहे. सदर अहवालास मंजूरी प्राप्त झाल्यास त्याचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समावेश करण्यात येईल. १० कि.मी. परिसरात वाघांची दळणवळण आहे. अहवालाच्या चॅप्टर ४ मध्ये त्या संदर्भातील उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली आहे. या अहवालामध्ये सीईआर व वन्यजीव संवर्धनाबाबतची माहिती देण्यात आली आहे. |

२१) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | मी आश्वासित करू इच्छितो की, मे. निलकंठ इन्फ्रा या प्रकल्पाद्वारे पुढील तीन वर्षांमध्ये प्रदूषण नियंत्रण, कामाची पद्धत, कोळसा खाण उत्खनन पद्धत, वाहतूक पद्धत इतक्या चांगल्या प्रकारे राबविले जाईल की, आपण पुढे येणाऱ्या उद्योगांना या प्रकल्पाचे उदाहरण देतील. जमीन अधिग्रहण करताना कोणत्याही प्रकारे निलकंठ कंपनीतर्फे मध्यथ व्यक्तिची नेमणूक करण्यात येणार नाही. २५०० झाडे प्रति हेक्टर नियमानूसार आमच्या प्रकल्पातर्फे कसे लावले जातील याबाबत वृक्षारोपण करून दाखविण्यात येईल. वन कायद्यानूसार आम्ही या वृक्ष लागवडीकरिता बांधिल आहोत. या परिसरातील गावांचा विकास होणे गरजेचे असून या परिसरात लोकप्रतिनिधींच्या सहमतीने व शासनाच्या सल्ल्यानूसार एक प्राथमिक आरोग्य केंद्र आमच्यातर्फे सुरू करण्यात येईल याचे मी आश्वासन देतो. तसेच या परिसराकरिता शासनातर्फे अस्तित्वात असलेल्या आरोग्य केंद्रांच्या जीर्णोद्धराकरिता योजना असल्यास परिसरातील सर्व उद्योगांसोबत त्यामध्ये उत्साहाने सहकार्य केले जाईल. सीएसआर अंतर्गत रूग्णवाहिकेची सुविधा गणेशोत्सवाच्या पूर्वी झरी तालुक्यातील अडकोली, मार्की, पवनार या गावांकरिता पूरविण्याबाबत प्रयत्न केले जातील. सदर जनसुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांचे मी स्वागत करतो व पुढील ७ दिवसात अंतिम अहवाल संबंधित सर्व ग्रामपंचायतींमध्ये सादर करण्याचे मी आश्वासन देतो. |

२२) **मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | प्रकल्प प्रवर्तकांनी बरेच मुद्दे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहेत. परंतु या प्रकल्पामध्ये जमीन अधिग्रहण करताना दलालांचा समावेश कण्यात येऊ नये याबाबत कंपनीने दक्षता घ्यावी. दलालांचे समावेश करण्यात आल्यास कंपनीवर प्रशासनातर्फे कारवाई करण्यात येईल. जमीन खरेदीची प्रक्रिया कशी राहीणार याबाबत कंपनीने सविस्तर उत्तर द्यावे. सीएसआर बाबत सांगण्यात आले आहे. परंतु पुढे काही करण्याचे प्रस्तावित असल्यास त्याबाबत माहिती देण्यात यावी. रोजगाराबाबत माहिती देण्यात यावी. नूकसान भरपाई बाबत मी पूर्वीच सांगितल्याप्रमाणे शासनस्तरावर समिती स्थापन करण्यात आली असून त्यावर काम सुरू आहे. |

२३) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | जमीन अधिग्रहण करताना जमीन दलालांमार्फत न घेण्याबाबत मे. निळकंठ इन्फ्रा हा उद्योग कटीबद्ध आहे. इतर प्रकल्पांमुळे स्थानिकांना जो अनुभव आला तो आमच्या प्रकल्पाशी जोडण्यात येऊ नये. कंपनीला जर दलालांमार्फत जमीन खरेदी करावयाची असती तर आजपर्यंत कंपनीचा दलाल शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला असता. परंतु आजपर्यंत असे काही झाले नाही. जमीनीचा मोबदला देताना थेट वाटाघाटी करण्यात येईल. RFCTLAAR Act मध्ये सेक्शन २६ ते ३० पर्यंत जमीन अधिग्रहण व मोबदला याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली असून त्याचे तंतोतंत पालन कंपनीतर्फे करण्यात येईल याचे मी आश्वासन देतो. तसेच सन २०१८ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आलेल्या सुधारणेनूसार थेट वाटाघाटी करताना निश्चित करण्यात आलेल्या दरापेक्षा २५ टक्के जास्त दर देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. शेतीचा मोबदला देताना त्यामध्ये पारदर्शकता व Rationalization सुद्धा करण्यात येईल. कंपनीतर्फे एकही प्रस्ताव मी स्वत: किंवा मे. निळकंठ इन्फ्राच्याय म्हणण्यानूसार घेण्यात येणार नाही. सर्व प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीमार्फत घेण्यात येईल व सदर प्रस्तावांवर RFCTLAAR Act च्या तरतूदीनूसार जी किंमत काढण्यात येईल त्यानूसार मोबदला देण्यात येईल. स्थानिकांना नोकरीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानूसार ८० टक्के प्राधान्य देण्यात येईल. कंपनीतर्फे परप्रांतीय नागरीकांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात येणार नाही. येथे ५७० रोजगार कसे निर्माण होईल याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. कंपनीतर्फे कोणत्याही कंत्राटदाराला कोळसा उत्खानाकरिता जमीन देण्यात येणार नाही. शेतमजूरांना अप्रत्यक्ष रोजगार देण्यात येईल. तसेच अप्रत्यक्ष रोजगारामध्ये शेतमजुरांना प्राधान्य देण्यात येईल. वन हक्काबाबत शासनाचे जे निर्णय राहणार त्यानूसार कार्यवाही करण्यात येईल. कायद्यानूसार सन २०२५ च्या खाणकाम मार्गदर्शक तत्त्वानूसार कोळसा असलेली जमीन आमहला देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त जमीन शासनाने दिली तर त्यावर योग्य ती कार्यवाही कंपनीतर्फे करण्यात येईल. उर्वरित जमीनीबाबत आमच्याकडून कोणताही प्रस्ताव तयार करण्यात आलेला नाही. |

२४) **मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | प्रकल्पाशी संबंधित मुद्यांवर कंपनीतर्फे कार्यवाही करण्यात येईल. शासनाशी संबंधित विषयांची नोंद घेण्यात आलेली असून सदर मुद्यांचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समावेश करून शासनाकडे सादर करण्यात येईल व त्याबाबत शासनातर्फे योग्य तो निर्णय घेण्यात येईल. त्यामध्ये जमीन अधिग्रहण, गावाचे पुनर्वसन, रस्ता वळविणे, वन क्षेत्र अधिग्रहीत करणे, वन पट्टे देणे, इत्यादीबाबत नोंद घेण्यात आली आहे. रोजगार, वृक्षारोपण व पर्यावरण विषयक उपाययोजना हे महत्तवाचे विषय आहेत. स्थानिकांनी जवळपास ७०-८० मुद्दे मांडलेली आहेत. पर्यावरण मंजूरी देणाऱ्या समितीपुढे कंपनीशी संबंधित व प्रशासनासंबंधित मुद्यांबाबत चर्चा करण्यात येईल व योग्य तो निर्णय घेण्यात येईल. त्याची पोहोच करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व कंपनीतर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. जनसुनावणीदरम्यान प्रशासनाला देखील त्यांच्याशी संबंधित मुद्यांबाबत माहिती मिळते. जमीन अधिग्रहणावर स्थानिक प्रशासनाचे लक्ष राहणार आहे. प्रकल्पग्रस्त क्षेत्रामध्ये शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधा कशा प्रकारे सुधारण्यात येऊ शकतात याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पुढील काळात त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील व सकारात्मक परिणाम दिसू शकतात. जनसुनावणी झाल्यानंतर इतर मुद्यांबाबत चर्चा करण्यात येईल त्यामुळे स्थानिक प्रशासनाला देखील शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे सोईचे होईल. |

**२५) एक इसम, अडकोली, ता. झरीजामणी, जि. यतवमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | आमच्या ५ एकरपैकी १.५ एकर जमीन अधिग्रहीत करण्यात आली नाही तर त्याबाबत शासन काय निर्णय घेईल. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. याबाबत कंपनी प्रशासन व जिल्हा प्रशासनाकडे अधिकारी नाहीत. कंपनीला जर खाणकाम क्षेत्र वाढवून देण्यात आले तर त्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल व योग्य तो निर्णय घेण्यात येईल. जर कंपनीतर्फे खाण परिसराबाहेर अधिभार ढिगारे टाकण्यात आले तर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात दंड आकारण्यात येईल. |

**२६) श्री. विजय पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. वणी, जि. यतवमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | २५०० लोकांना रोजगार देण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु त्यामध्ये मॅनेजर, लेखा, सुपरवायझर, कार्मिक प्रबंधक, सामाजिक कार्य, (CSI) कामगार, शिक्षणानूसार कोणत्या वर्गवारीत किती रोजगार देणार आहे त्याची माहिती देण्यात आलेली नाही. ५५७ नोकऱ्या प्रस्तावित असून त्यामध्ये किती पदांची भरती घेण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. यामध्ये १२ बलुतेदार आणि भममिहीन शेतमजूरांचा समावेश आहे. ६५० एकरामध्ये कंपनीतर्फे ५५७ नोकऱ्या देण्यात येणार आहे. परंतु भूमिहीन शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारे नोकऱ्या देण्यात येतील याची माहिती देण्यात यावी. अप्रत्यक्ष रोजगारामध्ये कोणत्याही प्रकारचे रोजगार देण्यात येत नाही. ५५७ नोकऱ्या दिल्यानंतर २५०० लोक बेरोजगार होणार आहेत. त्यांच्या उपजिविकेसाठी पेसाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या सूचनेचे उल्लंघन होणार आहे. त्या अनुषंगाने कंपनीतर्फे काय उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. सदर खाण प्रकल्प १२ वर्ष सुरू राहणार व त्यानंतर ५ वर्षे खाणीमध्ये पुनर्भरण करण्यात येईल. परंतु १२ वर्षांनंतर स्थानिक युवक कशा प्रकारे उदर्निर्वाह करणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मे. माणिकगड कंपनीने सन २०२१ RFCTLAAR कायद्यानूसार रेडी रेकनर दर रू. ७२०००/- एकर प्रमाणे निश्चित केला होता. त्या ठिकाणी जमीनीचा दर रू. २८८०००/- इतका होता. आज या परिसरात जमीनीचा दर रू. ६५१०००/- इतका असल्याने झरीजामणी, अडकोली या परिसरातील जमीनींची परिगणना होऊन जमीनीचा मोबदला किती मिळणार आहे. रू. १.५ कोटी, रू. २.० कोटी किंवा रू. ५.० कोटी मिळणार आहे याची माहिती देण्यात यावी. वाटाघाटीदरम्यान नैसर्गिक न्याय तत्त्वाने जो अधिकार आहे त्याबाबत स्थानिकांतर्फे विचार करण्यात येईल. दर निश्चित झाल्यास स्थानिकांना त्याबाबत निर्णय घेणे सोईचे होईल. आतापर्यंत मी ३२ जनसुनावण्यांमध्ये सहभाग नोंदविला आहे. जेव्हा जेवहा मी आक्षेप घेतला आहे तेव्हा पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना २००६ व २००९ नूसार पर्यावरण आघात मुलयांकन अहवालामध्ये खरी माहिती असणे आवश्यक असल्याचे | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, कंपनीला सुचित करण्यता येते की, जर स्थानिकांमध्ये आपणांस गरज असलेल्या पदांकरिताचे कौशल्य किंवा पदवी असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात यावे. जनसुनावणीमध्ये उपस्थित मुद्यांची नोंद पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये घेणे हे हेतु आहे. कंपनीने जनसुनावणीदरम्यान काही नवीन संकल्पना लक्षात आल्यास त्याबाबत आश्वासन द्यावे. महत्त्वाच्या विषयांबाबत कंपनीने आश्वासन दिलेले आहे. स्थानिकांचा व प्रकल्प प्रवर्तकांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण करून प्रकल्प कार्यान्वित करणे आहे. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांना देखील प्रकल्प कार्यान्वित करणे शक्य होईल. नोकरी बाबत शासनातर्फे योग्य निर्णय घेण्यात येईल. दुसऱ्या ठिकाणी जमीनीच्या दराबाबत काय ठरविण्यात आले याची माहिती घेण्यात येईल परंतु त्याकरिता कंपनीला बांधील करू शकत नाही. तसेच स्थानिक शेतकऱ्यांना जास्त प्रमाणात मोबदला कशा प्रकारे मिळत आहे याबाबत प्रयत्न करण्यात येईल. पर्यावरण आघात मुल्यांकन म्हणजे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत अभ्यास करण आहे. जनसुनावणीदरम्यान यापैकी कोणताही मुद्दा सुटता कामा नये. प्रकल्प प्रवर्तकाने तयार केलेल्या प्राथमिक अहवालामध्ये काही गोष्टी सुटल्या असतील तर त्याबाबत चर्चा करून त्याचा समावेश अंतिम अहवालात करण्यात यावी. रस्ता व इतर विषयांमुळे स्थानिकांवर त्याचा विपरीत परिणाम पडणारच आहे. जनसुनावणीदरम्यान कोणताही विषय सुटता कामा नये याकरिता चर्चा करण्यात येते. रस्त्यांचे बांधकाम करणे ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वी भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांबाबत आराखडा तयार करून प्रकल्प कार्यान्वित केल्यानंतर समस्यांचे |

| | | |
|---|---|---|
| | मत नोंदविलेले आहे. सदर कंपनीने मे. सृष्टी सेवा या कंपनीला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याचे काम दिलेले आहे. त्यामध्ये या परिसरातील भौगोलिक स्थिती, जैव विविधता, वनसंपदा, खनिज संपदा या सर्व गोष्टींची सत्य माहिती असणे अपेक्षित आहे. परंतु जर खोटी माहिती सादर करण्यात येत असेल तर हे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेचे उल्लंघन आहे. तसेच खोट्या माहितीवर आक्षेप घेणे या परिसरातील स्थानिकांना हक्क आहे. आमच्यातर्फे एका प्रकल्पाची जनसुनावणी रद्द करण्यात आली व नोकऱ्यांचे नियुक्तीपत्र दिल्यानंतरच प्रकल्पाला पाठींबा दर्शविला. सदर परिसरात किती झाडे आहेत याची माहिती देण्यात आली नाही व त्याबदल्यात किती प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे याची माहिती देखील देण्यात आली नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरणाशी संबंधित उत्तरे द्यायला पाहिजे. तसेच १९ कि.मी. वाहतूकीचा रस्ता असल्याचे सांगण्यात आले परंतु त्याची भारनियमन क्षमता व सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग किंवा इतर रस्ता आहे याची माहिती देण्यात आलेली नाही. या क्षेत्रातील रस्ते रोजगार हमी योजना १९७१ नूसार तयार करण्यात आले. सदर जनसुनावणीदरम्यान प्रादेशिक परिवहन अधिकारी उपस्थित असायला पाहिजे होते. त्यामुळे रस्त्याबात योग्य ती माहिती मिळाली असती. मागील मुंगोली खाणीच्या जनसुनावणीदरम्यान मी हाच मुद्दा उपस्थित केला होता व वे.को.लि.ने कोळशाच्या वाहतूकीसाठी ९.० कि.मी. रस्ता तयार केला व स्थानिकांसाठी ५.० कि.मी. चा रस्ता तयार केला. झरीजामणी, अडकोली, पवनार येथील स्थानिक मुकुटबनला ये-जा करताना जर अपघात झाला तर याची जबाबदारी कंपनी घेणार काय. | निराकरण कसे राबविता येईल हा हेतु आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहाय्याने जिलहा प्रशासनातर्फे काही ठोस निर्णय घेण्यात येणार असून कंपनीला त्याचे पालन करणे बंधनकारक आहे. जे मुद्दे जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आले आहेत त्याची नोंद घेण्यात आली असून अंतिम अहवालाची प्रत ग्रामपंचायतीकडे पोहोचण्याबाबत कंपनीने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने लक्ष द्यावे. |

**२७) <u>श्री. आशिष फुलसंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. वणी, जि. यतवमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने सादर केलेल्या अहवालामध्ये बऱ्याच त्रुट्या आहेत. मा. जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनूसार कंपनीच्या अहवालातील त्रुट्यांची सुधारणा करून परिसरातील | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जनसुनावणीमध्ये खुलासा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जनसुनावणीदरम्यान उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| | तथ्यंना आधार धरून प्रकल्प अहवालात सुधारणा करून ही जनसुनावणी परत घेण्यात यावी. | मुद्यांवर प्रकलप प्रवर्तकांतर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे याचा समावेश अंतिम अहवालामध्ये करण्यात येतो. त्याची तपासणी करण्यात येते व त्यांनतरच प्रकल्पाला पर्यावरण विषयक मंजूरी देण्यात येते. जितक्या लवकर जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल तितक्या लवकर पुढील प्रक्रिया पार पाडणे शक्य होईल. त्यामध्ये काही अडचण आल्यास जिल्हाधिकारी कार्यालय, भूसंपादन कार्यालय, पुनर्वसन कार्यालय तसेच उपविभागीय अधिकारी यांचेकडे समस्या मांडण्यात याव्यात. तसेच स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत योग्य तो पाठपुरावा करण्यात येईल याची हमी देतो. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे स्रर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १० सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(सुशिलकुमार राठोड)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(विकास मीना, भा.प्र.से.)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
जिल्हादंडाधिकारी, यवमताळ,
जिल्हा यवतमाळ.